नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## पाकिस्तान सीमेवर ८ दहशतवादी तळ

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १३ :
आर्मी चीफ जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मंगळवारी सांगितले की, ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे. भविष्यात कोणत्याही प्रकारच्या दहशतवादी किंवा लष्करी दुस्साहसासाठी आम्ही पूर्णपणे तयार आहोत. भारत पूर्ण ताकदीने प्रत्युत्तर देईल.
जनरल द्विवेदी यांनी सांगितले की, सीमेवर अजूनही ८ दहशतवादी तळ सक्रिय आहेत. जर कोणतीही हालचाल झाली तर कारवाई केली जाईल. त्यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूर हे भूदल, वायुदल आणि नौदल यांच्या समन्वयाचे उत्तम उदाहरण आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये १०० पाकिस्तानी सैनिक मारले गेले.

* वर्ष ५१ * अंक १९२ * * अमरावती * बुधवार, दिनांक १४ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## १२ दुणे २४ बाकी




अखेर आज निवडणूक आयोगाने १२ जिल्ह्याच्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची घोषणा केली. महाराष्ट्रात ३६ जिल्हे आहेत, त्यापैकी फक्त बारा जिल्ह्यात नियमप्रमाणे राखीव जागांची संख्या असावी. म्हणजेच या बारा जिल्ह्यातील ग्रामीण जनतेला आपले मत देण्याची संधी मिळेल. बाकीच्या जिल्ह्यांमध्ये ही व्यवस्था का झाली नाही याचा खुलासा झालाच पाहिजे. निवडणूक आयोगाला वषार्नुवर्षे काहीच काम नव्हते मग हा प्रकार होण्याचे कारण काय. राज्यातील नगरपालिका निवडणुका संपन्न झाल्या त्या त्या ठिकाणी नगराध्यक्ष बसले आणि कामकाजही सुरू झाले. आता परवा महानगर पालिकांच्या निवडणुकाही संपन्न होणार आहेत. त्यानंतर ५ फेब्रुवारीला म्हणजे तेथील संपूर्ण शहरी विभाग आणि एक तृतीयांश ग्रामीण विभाग यांना मतदानाची संधी मिळणार आहे. मग उरलेल्या २४ जिल्ह्यांनी काय गुन्हा केला होता की, तेथील ग्रामीण भागात राहणा?्या नागरिकांना त्यांची कोणतीही चूक नसताना मतदानापासून अजून काही काळ वंचित ठेवण्यात आलेले आहे. त्यातच दोन ते तीन महिने सतत आचारसंहिता लागू असल्याने अनेक विकासाची कामे थांबलेली आहेत. आता ही घोषणा झाल्यामुळे लाडक्या बहिणींनाही त्यांची अपेक्षित राशी मिळेल की नाही मिळणार? याचीही शंकाच आहे. कारण न्यायालयाने आदेश दिल्यामुळे आयोगाने आपले काम सुरू केलेले आहे, पण जोपर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पडत नाही तोपर्यंत आचारसंहितेचा बडगा कायम असणार आहे. आपल्या देशात लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या सर्व निवडणुका एकाच वेळी घेण्याचा प्रस्ताव आहे. तसा कायदाही करण्याचा सरकारचा इरादा आहे पण असा कायदा करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे किती कठीण आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. वरच्या यादीमध्ये आम्ही ग्रामपंचायतीचा समावेश मुद्दाम केला नाही. याशिवाय पदवीधर मतदारसंघ, शिक्षक मतदार संघ अशासारख्या अनेक निवडणुका घ्यायच्या असतात. निवडणूक आयोगाने निदान महाराष्ट्रात आता तरी त्वरित पावले उचलून उरलेल्या २४ जिल्ह्यामधील ग्रामीण जनतेला आपला मतदानाचा हक्क बजावण्याची संधी दिलीच पाहिजे. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे फेब्रुवारीच्या अखेरपर्यंत या निवडणुका संपन्न झाल्याच पाहिजेत. आयोगाने त्यासाठी पुन्हा मुदतवाढ मागू नये म्हणजे मिळवली. नेहमीप्रमाणे विदर्भ आणि खान्देशातील जिल्हे निवडणूक न घेण्याच्या यादीमध्ये आहेत. हे सुद्धा नवल नाही काय. असो, आयोगाला यापुढे तरी सुबुद्धी सूचो.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## महानगरपालिका निवडणूक
# प्रचार तोफा शांत!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. १३ :
राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकांसाठी प्रचार मंगळवारी ५.३० वाजता थांबला.

पक्षाच्या प्रचारासाठी प्रचारसभा, मुलाखती, रॅली, तसेच ध्वनिक्षेपकावरील भाषणे, गल्लीबोळयात ऐकू येणारे प्रचारगीत आता थांबलेले आहे. प्रचार साहित्य हे काढून घेण्यात येत असून आता निकालाची प्रतीक्षा शिगेला पोहोचली आहे.

भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या नागपुरात भाजप कार्यकर्त्यांनी केलेल्या बंडखोरीमुळे हाय होल्टेज ड्रामा नागपुरात बघायला मिळाला. या उमेदवारांनी बंडखोरी मागे घ्यावी म्हणून भाजप नेत्यांनी त्यांची मनधरणी सुद्धा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॅमेज कंट्रोल करण्यासाठी येथे प्रचार सभा आणि त्यांनी तर्री पोह्याचा कार्यक्रम सुद्धा मुलाखती द्वारे आयोजित केला. या माध्यमातून नागपूर येथील जनतेशी त्यांनी खुला संवाद साधला आणि विकासाचे विजन मांडले.

चना पोहा विथ नितीन गडकरी या कार्यक्रमातून गडकरी यांनी प्रचार केला. या सर्व प्रचार मोहिमा आता थांबल्या आहेत. नागपूरचा महापौर कोण होणार याकडे जनतेने लक्ष वेधले आहे. दरम्यान, गुरूवारची रात्र कत्ल की रात्र म्हणून उमेदवार, पक्ष व मतदारांसाठी महत्वाची आहे.



## मुख्यमंत्री झाले बुलेटस्वार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
प्रचाराच्या शेवटच्या दिवशी नागपुरात रॅली, रोड शोची स्पर्धा लागली असुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दुचाकीवर स्वार होऊन नागपूरकरांसोबत संवाद साधला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही मुख्यमंत्र्यांना साथ दिली.

आजपर्यंत नागपुरात केवळ भाजपने विकास केला असून नागपूरकर यावेळी भरघोस मतदान करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विरोधकांनी कधीही विकास केला नसून ती जबाबदारी आमच्यावर सोपवा, असे आवाहन त्यांनी नागपूरकरांना केले.

## निवडणूक आयोगाच्या निर्णयाने
## नवा वाद उफाळणार?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
राज्यात २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. महापालिकांच्या निवडणुकीच्या मतदासाठी काही तास शिल्लक असताना मुंबईतील निवडणूक विभागाने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे.

निवडणुकीच्या प्रचाराचा कालावधी संपल्यानंतरही मुंबईतील उमेदवाराला घरोघर प्रचार करण्याची मुभा दिली आहे. या अजब निर्णयाबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचाराचा कालावधी १३ जानेवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत होता. मात्र याचदरम्यान निवडणूक आयोगाने एक मोठा निर्णय घेतला. प्रचार कालावधी संपल्यानंतरही मुंबई महानगरपालिकेतील उमेदवाराला घरोघर प्रचार करण्यास निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे. त्यामुळे प्रचाराची मुदत संपल्यानंतरही उमेदवारांना घरोघर जाऊन प्रचार करता येणार आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाने नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

## जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या
# निवडणुका जाहीर
### ५ फेब्रुवारीला मतदान, ७ फेब्रुवारीला निकाल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान, तर ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल.

जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१, तर पंचायत समित्यांच्या १४६२ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. या सर्व जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या क्षेत्रांत आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

वाघमारे यांनी सांगितले की, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांसाठी ही निवडणूक होत आहे. या निवडणुकीची सूचना १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध होईल. सूचना प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया संबंधित जिल्हाधिकारी आपापल्या स्तरावर पार पाडतील. निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया १६ जानेवारीपासून सुरू होईल. उमेदवारांना २१ जानेवारीपर्यंत आपली उमेदवारी दाखल करता येईल.

**उमेदवारांसाठी खर्च मर्यादा**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी उमेदवारांना खर्च मर्यादा पुढील प्रमाणे असेल: ७१ ते ७५ निवडणूक विभाग असलेल्या जिल्हा परिषदांसाठी ९ लाख आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी ६ लाख रुपये खर्च मर्यादा असेल.

६१ ते ७० निवडणूक विभाग असेल्या जिल्हा परिषदांसाठी ७ लाख ५० हजार आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी ५ लाख २५ हजार रुपये खर्च मर्यादा असेल. ५० ते ६० निवडणूक विभाग असेल्या जिल्हा परिषदांसाठी ६ लाख आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी ४ लाख ५० हजार मर्यादा असेल.
या निवडणुकीत प्रत्येक मतदाराला एक जिल्हा परिषद व दुसरे पंचायत समितीसाठी असे २ मत द्यावे लागेल.

### जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक कार्यक्रम

| | |
|---|---|
| जिल्हाधिकाऱ्यांकडून निवडणूक कार्यक्रमाची प्रसिद्धी | १६ जानेवारी |
| उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत | १६ ते २१ जानेवारी |
| उमेदवार अर्जांची छाननी | २२ जानेवारी |
| अर्ज मागे घेण्याची मुदत | २७ जानेवारी (दुपारी ३ वाजेपर्यंत) |
| अंतिम उमेदवार यादी व निवडणूक चिन्ह वाटप | २७ जानेवारी (दुपारी ३.३० नंतर) |
| मतदानाचा दिवस | ५ फेब्रुवारी (स. ७.३० ते सायं. ५.३०) |
| मतमोजणी | ७ फेब्रुवारी (सकाळी १० वाजेपासून) |

## विदर्भातील चार मनपासाठी काट्याची टक्कर

■ महासागर प्रतिनिधी/ नागपूर, चंद्रपूर, अमरावती, अकोला, दि. १३:
राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी गुरूवार १५ जानेवारी रोजी मतदान होत असून, शुक्रवार १६ जानेवारी रोजी निकाल हाती येणार आहे. या २९ मनपामध्ये विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या चार महानगरपालिकांचा समावेश असून, मंगळवारी सायंकाळी प्रचार तोफा शांत झाल्या. दरम्यान, चारही मनपामध्ये राजकीय पक्षांमध्ये काट्याची टक्कर होत असून, अनेक अपक्षांनीही तगडे आव्हान उभे केले आहे.

नागपूर मनपाच्या ३८ प्रभागांमधून १५१ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. येथे भाजपाने शिंदेसेनेसह युती केली असली तरी, बहुतेक जागा भाजपा लढवत असून, शिंदेसेनेच्या वाट्याला नाममात्र जागा आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, भाजपाचे ३ आमदार तसेच भाजपाच्या काही बड्या नेत्यांनी नागपूर मनपाची सत्ता हस्तगत करता यावी म्हणून जीवाचे रान केल्याचे दिसून आले.

दुसरीकडे, आमदार विकास ठाकरे, डॉ. नितीन राऊत, विजय वडेट्टीवार या नेत्यांनी काँग्रेसच्या अधिकाधिक जागा जिंकून याव्यात यासाठी सर्व शक्ती पणाला लावली आहे. काँग्रेस येथे स्वबळावर लढत असून, भाजपाला तगडी टक्कर देत आहे. आघाडीमधील उबाठा, शरद पवार राष्ट्रवादी आपापल्या परीने लढतीत असले तरी, सर्व प्रभागात ते रिंगणात नाहीत.

अजित पवार यांची राष्ट्रवादीही आपली ताकद आजमावत आहे. बसपा, वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी यासारख्या पक्षांन्सह अनेक अपक्ष उमेदवारांनी काही प्रभागात प्रस्थापितांसमोर मोठे आव्हान उभे केल्याचे दिसून येते. सर्वच राजकीय पक्षांना येथे बंडखोरीची लागण झाली असून, बंडखोरांवर निलंबनाची कारवाई सुद्धा करण्यात आली आहे.

**अकोला** : महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये भाजप - शिवसेना शिंदे गट हे महायुतीचे घटक पक्ष अकोला शहरात आपसातच भिडले असून यांच्यासोबत शिवसेना (उबाठा) अनेक प्रभागांमध्ये थेट एकमेकांसमोर उभ्या ठाकल्या आहेत.हा संघर्ष केवळ निवडणुकीपुरता नसून तो विचारधारा, नेतृत्व आणि जनाधाराचा पाहणारा आहे.काँग्रेस आणि एम.आय.एम. यांच्यातील संघषार्मुळे पारंपरिक मतपेढ्या विभागल्या जाण्याची शक्यता आहे.या संघषार्चा थेट फायदा तिसऱ्या शक्तींना होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.
शिवसेना शिंदे गटासाठी ही निवडणूक म्हणजे अस्तित्वाची लढाई ठरत आहे. संघटनात्मक ताकद आणि विश्वासार्ह नेतृत्व या कसोटीवर शिंदे गटाची खरी परीक्षा होत आहे.दोन्ही राष्ट्रवादी पक्ष सध्या राजकीयदृष्ट्या गोंधळलेल्या व कमकुवत अवस्थेत दिसत आहेत. काही प्रभागांमध्ये वंचितचा प्रभाव असून त्या जागेवर ते आपला प्रभाव दाखवू शकतात. यावर्षी कार्यकर्त्यांमध्ये दिशाहीनता आणि मतदारांमध्ये संभ्रम हे त्यांचे मोठे आव्हान ठरले आहे. भाजपा सत्तेत असल्यावरही त्यांना महापालिकेत मोठा विरोध होत असून त्यांच्या जागा कमी होण्याचे चित्र असून आपसातील गटबाजी नुकसानकारक ठरू शकते.

**चंद्रपूर** : महानगरपालिका निवडणुकीत आज सायंकाळी ५ वाजता नंतर प्रचाराचा भोंगा शांत झाला. गेल्या बारा ते तेरा दिवसांपासून राजकीय पक्षांनी प्रचाराची राळ उडविली होती. आरोप प्रत्यारोप, एकमेकांना डिवचणे, बॅनरवर शेण फेकणे, मतदारांचा उमेदवारावर रोषपासून अखेर आज महानगरपालिकेच्या नावाचे बनावट शिक्के मारलेले घरपट्ट्याचे पत्र वाटपाने प्रचाराची सांगता झाली.
चंद्रपूर महानगरपालिकेत सत्ताधारी महायुतीचे दोन पक्ष भाजपा व शिंदे सेना युतीत लढली तर युतीचा तिसरा घटक पक्ष राष्ट्रवादी अजीत पवार गटाने स्थानिक किसान मजदुर काँग्रेस सोबत आघाडी बनवून उमेदवार उतरविले. विरोधी पक्षाचे काँग्रेसने स्वबळावर निवडणूक लढविली तर उबाठाने वंचित बहुजन आघाडीसोबत एकत्र येत निवडणूकीत उतरले तर राकाँ शरद पवार गट, मनसे स्वतंत्रपणे मैदानात उतरले होते. यात भाजपासह काँग्रेस बंडखोरांनी एकाकी किल्ला लढविला यामुळे अनेक ठिकाणी रंगतदार लढत होणार आहे. सत्ताधारी महायुती विरोधात जनतेच्या संतापाला काँग्रेस, उबाठा योग्य नियोजन अभावी स्वताकडे वळवू शकली नाही. भाजपा प्रमाणे काँग्रेसमध्ये खासदार प्रतिभा धानोरकर व विधीमंडळ नेते आ. विजय वडेट्टीवार यांच्यामध्ये हेवेदावे समोर आल्याने दोघेही एका मंचावर एकत्र येऊ शकले नाही. याचा फटका काँग्रेसला बसण्याची शक्यता आहे तर दुसरीकडे सत्ताधारी भाजपाने मित्रपक्ष शिंदे सेनेला केवळ आठ जागा देत संपूर्ण ताकदीनीशी निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र भाजपामध्ये माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार व आ. किशोर जोरगेवार यांच्यातील तणावामुळे भाजपा उमेदवारांच्या प्रचाराची धार बोथट झाल्याचे दिसून येत आहे. दोन्ही प्रमुख भाजपा व काँग्रेसमधील गटबाजीमुळे मनपा निवडणुकीत मतदारांचे चांगलेच करमणूक झाली असून निवडणुकीत कोण्या एका पक्षाला निर्विवाद यश मिळेल असे वाटत नाही. मतदारांना नेत्यामंधील भांडण काही पसंत आले नसल्याने याचा परिणाम निकालातून स्पष्ट होणार आहे.







## मी मुंबईला येतोय, माझे पाय छाटा



अण्णामलाईंचे ठाकरे बंधूना आव्हान

■ मुंबई, दि. १३ :
मुंबई महापालिका निवडणुकीच्या ऐन तोंडावर मुंबई आंतरराष्ट्रीय शहर असल्याचे विधान करून भाजपची अडचण करणाऱ्या के. अण्णामलाई यांनी आपण आपल्या विधानावर ठाम असल्याचा पुनरुच्चार केला आहे. मुंबई महाराष्ट्रापुरते मर्यादित शहर नाही. ते एक आंतरराष्ट्रीय शहर आहे. पण त्याचा अर्थ असा नाही की महाराष्ट्रातील लोकांनी मुंबई उभी केली नाही, असे ते म्हणाले. मला धमकावणारे राज ठाकरे व आदित्य ठाकरे कोण, असा सवालही त्यांनी याप्रकरणी केला आहे. मी मुंबईला येतोय, माझे पाय छाटून दाखवा, असे आवाहन त्यांनी ठाकरे बंधूंना दिले.

मुंबईतील वॉर्ड क्रमांक ४७ मध्ये एका वृत्तवाहिनीशी बोलताना अण्णामलाई असेही म्हणाले की, केंद्रात मोदी, राज्यात फडणवीस आणि मनपा भाजपचा महापौर असेल तरच विकास होईल. त्यावर खा. संजय राऊत फडणवीस-शिंदेंना उद्देशून म्हणाले की, कुणीही लुंग्या-सुंग्या येतो आणि मुंबई महाराष्ट्राची नाही म्हणून आमच्या तोंडावर चप्पल मारून जातो. मग तुमचा स्वाभिमान कुठे गेलाय? मी धमक्यांना घाबरणारा असतो, तर मी माझ्या गावात लपून बसलो असतो. जर मी म्हणालो की, मुंबई हे एक आंतरराष्ट्रीय शहर आहे, तर त्याचा अर्थ असा होतो का की, महाराष्ट्रातील लोकांनी मुंबई उभी केली नाही? हे सर्व अज्ञानी लोक आहेत, असे ते म्हणाले.

# आता चुकाल, तर मुंबईला मुकाल!



उद्धव ठाकरे यांनी मुंबईकर मतदारांना घातली साद

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी पुन्हा एकदा सत्ताधारी महायुतीवर निशाणा साधत मुंबईकर मतदारांना मुंबई आपल्याच म्हणजे मराठी माणसांच्याच ताब्यात ठेवण्याचे आवाहन केले. मुंबई आपली आहे, तिला आपल्याच ताब्यात ठेवा. आता चुकाल तर मुंबईला मुकाल, असे ते म्हणाले. सर्वसामान्यांच्या चेहऱ्यावरील उत्साह पाहून मला आपलाच विजय असल्याची खात्री पटली आहे. पण गेल्या एक-दोन दिवसांत पैशांचा अक्षरशः धुमाकूळ सुरू झाल्यामुळे सावधगिरी बाळगा, असेही ठाकरे यावेळी म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी आज मुंबई विमानतळ परिसरातील शिवसेनेच्या शाखांना भेटी दिल्या. त्यात त्यांनी आपल्या उमेदवारांसह कार्यकर्त्यांना मतदानाच्या दिवशी व नंतर काय काळजी घ्यायची? यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी भाजपवर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत पैशांचा वारेमाप वापर करण्याचा आरोप केला. तसेच निवडणुकीत आपलाच विजय निश्चित असल्याचा ठाम विश्वासही व्यक्त केला. ते म्हणाले, गत निवडणुकीत येथील आमच्या उमेदवाराचा निसटता पराभव झाला होता. पण यावेळी त्यांचा दणदणीत विजय होणार हे निश्चित आहे.

ते पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला कसे जगायचे? हे शिकवले. पण शिवाजी महाराजांचा झाकलेला पुतळा पाहून आपण ही निवडणूक कुणाविरोधात लढवत आहोत हे दिसून येत आहे. आज आपल्या दैवतांचे पुतळे झाकले जात आहेत. आपली अस्मिता मारण्याचा प्रयत्न होत आहे. आपल्याला भाषेवर आक्रमण होत आहे. मग आता तुम्ही विचाराल आपल्या विरोधात कोण आहे? आपल्या विरोधात कोण आहे हे तुम्हाला माहिती आहे. तो गद्दार आहे हा भाग वेगळा. पण ती जी वृत्ती आहे, ही वृत्ती गद्दारीची आहे. मला या गद्दार वृत्तीचा पराभव करण्यासाठी मला येथील माझ्या उमेदवारांचा विजय हवा आहे.

उद्धव म्हणाले, निवडून आलेले गद्दार होऊ शकतात. पण जे निवडून देतात ते गद्दार होऊ शकत नाहीत ही दाखवून देणारी ही निवडणूक आहे. तुमच्या चेहऱ्यावरील उत्साह पाहून मला आपलाच विजय आहे याची खात्री पटली आहे. मात्र गेल्या एक-दोन दिवसांपासून पैशांचा अक्षरशः धुमाकूळ सुरू आहे. हे एवढे निर्लज्ज व गद्दार लोक आहेत की, त्यांनी ठाण्यातील आपल्या व मनसेच्या उमेदवारांना 5-5 कोटींचे आमिष दाखवले होते. त्यांनी त्यांच्यापुढे उमेदवारी मागे घेण्याचा प्रस्ताव ठेवला होता. आम्ही आमची कामे घेऊन मतदारांना सामोरे जात आहोत. याऊलट ते पैशांचे आमिष दाखवून आमच्या उमेदवारांना माघार घेण्याचा इशारा देत आहे. यावरून त्यांनी आपल्या काळात कोणतेही काम केले नसल्याचे स्पष्ट होते. काम केले असते तर त्यांच्यावर असे करण्याची वेळच आली नसती.

उद्धव ठाकरे म्हणाले, भाजप व शिंदे गटाकडे सांगण्यासारखे काही नाही, पण वाटण्यासारखे बरेच काही आहे. आता त्यांना पैसे वाटतानाही पराभवाची भीती वाटत आहे. आजची रात्र व उद्याची रात्र कुणी पैसे वाटताना दिसला, तर बेलाशय काय करायचे ते करा. मला काय म्हणायचे आहे हे तुम्हाला समजले असेल. संबंधिताला पकडून पोलिसांच्या ताब्यात द्या. आता हे हजार दोन हजार रुपये वाटत असतील, पण तुम्ही तुमचे आयुष्य विकू नका.

## भाजप-शिवसेना शिंदे गटात राडा

■ महासागर प्रतिनिधी, अंबरनाथ, दि. १३ :
अंबरनाथ नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीनंतर शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महायुतीमधील भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये नगरपालिकेच्या बाहेर जोरदार राडा झाल्याचे पाहायला मिळाले. या हाणामारीचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.

अंबरनाथमध्ये भाजपचा नगराध्यक्ष निवडून आल्यानंतर उपनगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत येथील महायुतीमधील समीकरणे बदलले. शिंदे गट आणि अजित पवारांची राष्ट्रवादीने एकत्र येत बाजी मारली आणि राष्ट्रवादीचे सदा मामा पाटील यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाली. या पराभवामुळे भाजप कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत दोन आघाड्यांमध्ये लढत झाली होती. भाजपच्या अंबरनाथ विकास आघाडीला 28 मते मिळाली, तर अंबरनाथ शिवसेना महायुती विकास आघाडीला (शिंदे गट आणि अजित पवार गट) 32 मते मिळाली.

दरम्यान, सदा मामा पाटील यांची उपनगराध्यक्ष पदावर निवड होताच पालिकेच्या बाहेर दोन्ही बाजूच्या गटातील जोरदार घोषणाबाजी झाली. यावेळी सदा मामा पाटील यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते संतापले. या घोषणाबाजीचे रूपांतर नंतर थेट धक्काबुक्कीमध्ये आणि हाणामारीमध्ये झाले. यावेळी पोलिसांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. काही काळ येथे तणावाचे वातावरण बघायला मिळाले. अंबरनाथ नगरपालिकेत भाजपचे 16, तर शिवसेनेचे 27 नगरसेवक निवडून आले होते. पण भाजपने शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी प्रथम काँग्रेससोबत आघाडी केली. पण वरिष्ठांनी नाराजी व्यक्त केल्यानतंर भाजपने काँग्रेसचे 10 नगरसेवक फोडून अजित पवारांच्या राष्ट्रवादीशी संधान साधले. त्यानंतर सत्ता स्थापन करण्याचा दावा केला. पण भाजपच्या या खेळीमुळे शिंदे गट दुखावला गेला. परिणामी, त्याने भाजपची खेळी त्यांच्यावरच उलटून टाकण्याची धूर्त राजकीय खेळी खेळली.

## मुख्यमंत्र्यांचे मराठीपेक्षा हिंदीवर जास्त प्रेम



■ मुंबई, दि. १३ :
मुख्यमंत्र्यांना एवढं हिंदीवर प्रेम असेल तर त्यांनी उत्तर प्रदेश आणि मध्यप्रदेशात जाऊन निवडणूक लढवावी. तिकडून मुख्यमंत्री व्हावे. त्यांना मोदी कुठेही मुख्यमंत्री करू शकतात, जम्मू काश्मीर लदाखलाही मुख्यमंत्री करु शकतात, आपल्या मुख्यमंत्र्यांनाच मराठी विषयी प्रेम नाही, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मराठी संदर्भात किती खोटे बोलत आहे. काल नवी मुंबईच्या जाहीर नाम्यात भाजपने हिंदी सक्तीची करु असे सांगितले आहे. नवी मुंबईची भाषा मराठी नाही का? असा सवाल राऊत यांनी केला आहे. नवी मुंबई हे शहर आग्री, कोळी मराठी भाषिकांनी वसवलेले शहर आहे. तो संपूर्ण भाग मराठी आहे, तिथले आमदार आमचे नसले तरी मराठी आहेत, बाहेरची काही लोकं तिथे कामधंद्यासाठी आली आहेत. संजय राऊत म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वसई-विरारला मनपा निवडणुकीच्या प्रचारासाठी गेले आणि तिथे त्यांनी हिंदीमध्ये भाषण केले. विरारची भाषा हिंदी कधी झाली. तो मराठी माणसांचा परिसर आहे. तिथे काही बाहेरची लोकं आली असतील पण मुख्यमंत्र्यांनी मराठीत भाषण न करणे हे अगदी चुकीचे आहे. वसई-विरार हे चिमाजी अप्पाचे आहे फडणवीसांनी किमान पेशव्यांचा तरी मान राखायला हवा होता.

## आदित्य ठाकरेंच्या मतदारसंघात पैसे वाटपाचे आरोप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
मुंबई महानगरपालिका निवडणूक 2026 च्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले असतानाच, प्रचार संपण्याच्या काही तास आधी एक खळबळजनक प्रकरण समोर आले आहे. प्रचाराच्या तोफा थंडावणार असतानाच, ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांच्या वरळी विधानसभा मतदारसंघातून पैसे वाटपाचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांमुळे राजकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली असून, निवडणूक आयोग आणि पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

वरळी मतदारसंघातील प्रभाग क्रमांक 193 मध्ये ठाकरेंच्या शिवसेनेच्या उमेदवार हेमांगी वरळीकर यांचे पती हरिश वरळीकर यांनी महिलांना बैठकीच्या नावाखाली बोलावून थेट पैसे वाटल्याचा आरोप करण्यात आला आहे. अपक्ष उमेदवारांसह शिवसेना (शिंदे गट) च्या नेत्यांनी हे आरोप केले असून, यासंदभार्तील व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत.

प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात अशा प्रकारे पैसे वाटपाचे आरोप झाल्याने संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणाला अधिक राजकीय वजन मिळण्याचं कारण म्हणजे हे आरोप करणारे सूर्यकांत कोळी हे ठाकरेंच्या शिवसेनेचे माजी शाखाप्रमुख आहेत.

## भाजपमधुन माजी महापौरांसह ५४ जणांची हकालपट्टी

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १३ :
नाशिक महापालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे दोन दिवस उरले असतानाच भाजपने शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारी आणि इतिहासात नोंद होईल अशी कारवाई केली आहे. उमेदवारी न मिळाल्याने भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी करत अपक्ष किंवा इतर पक्षांच्या चिन्हावर निवडणूक लढवणाऱ्या माजी महापौरांसह 54 पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना भाजपने थेट पक्षातून हकालपट्टी केली आहे. निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या कठोर कारवाईमुळे नाशिकमधील राजकीय वातावरण आणखी तापले असून, भाजपने पक्षशिस्तीबाबत कोणतीही तडजोड न करण्याचा स्पष्ट संदेश दिल्याचे चित्र आहे.

भाजपने पक्षविरोधी कारवायांवर कठोर भूमिका घेत ही कारवाई केली असून, यामध्ये 20 माजी नगरसेवकांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या यादीत नाशिकचे माजी महापौरही असल्याने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात थेट निवडणूक लढवणे, अपक्ष किंवा इतर पक्षांकडून उमेदवारी स्वीकारणे हे गंभीर पक्षशिस्तभंग असल्याचे भाजपने स्पष्ट केले आहे. नाशिक भाजपच्या इतिहासातील ही सर्वात मोठी हकालपट्टी मानली जात असून, यामुळे बंडखोर गटाला मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे.

नाशिक महापालिकेत सत्ता मिळवण्यासाठी भाजपने यंदा शंभर प्लसचा नारा दिला होता. या उद्दिष्टासाठी भाजपने मोठ्या प्रमाणावर इतर पक्षांतील प्रभावशाली नेत्यांना आपल्या गोटात घेतले. अनेक इच्छुकांना उमेदवारीची आश्वासने देण्यात आली होती. 122 नगरसेवक पदांच्या जागांसाठी 1,077 इच्छुकांनी मुलाखती दिल्या होत्या. मात्र प्रत्यक्षात केवळ 122 उमेदवारी उपलब्ध असल्याने सर्वांना संधी देणे शक्य नव्हते. याच पार्श्वभूमीवर महायुती होणार की नाही, याबाबतही मोठा संभ्रम होता, ज्यामुळे अनेक कार्यकर्ते आणि नेत्यांमध्ये अस्वस्थता वाढली होती.

अखेर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने युतीची घोषणा केल्यानंतर भाजपने नाशिकमध्ये स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. भाजपने 118 उमेदवारांची यादी जाहीर केली, मात्र त्यानंतर एबी फॉर्म वाटपात मोठा गोंधळ उडाला. काही उमेदवारांचे अर्ज बाद झाले, तर काहींना शेवटच्या क्षणी उमेदवारी मिळाली नाही. यामुळे नाराजी अधिक तीव्र झाली. भाजपकडून इतर पक्षांतून आलेल्या 33 जणांना उमेदवारी दिल्याने जुन्या आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाचा भडका उडाला.

## बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी हॉल तिकिट वाटपाला सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून इयत्ता बारावीच्या लेखी परीक्षांबाबत महत्त्वाची अधिकृत सूचना जारी करण्यात आली आहे. मंडळाच्या निर्णयानुसार, यंदाच्या शैक्षणिक वर्षातील बारावीच्या लेखी परीक्षेला 10 फेब्रुवारी 2026 पासून सुरुवात होणार असून या परीक्षा 18 मार्च 2026 पर्यंत चालणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मंडळाने बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी हॉल तिकिटांचे वाटप सुरू केले आहे. गेल्या काही दिवसांपासून हॉल तिकिटांची प्रतीक्षा करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

यंदा बारावीच्या परीक्षेसाठी हॉल तिकिटे ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मात्र, केवळ ऑनलाईन डाउनलोड केलेले हॉल तिकिट ग्राह्य धरले जाणार नसून, संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना त्याची प्रिंट काढून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. मंडळाने सर्व महाविद्यालयांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, विद्यार्थ्यांकडून हॉल तिकिटाच्या प्रिंटसाठी कोणतेही शुल्क आकारू नये. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही आर्थिक अडचणीशिवाय आपले हॉल तिकिट वेळेत मिळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवाराच्या घरी छापा



■ अहिल्यानगर : अहिल्यानगर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठी खळबळ उडाली असून, शिंदेंच्या शिवसेनेचे उमेदवार आणि जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे यांच्या निवासस्थानी अचानक पोलिस प्रशासन आणि निवडणूक आयोगाच्या पथकाने छापा टाकल्याने वातावरण तापले आहे. अचानक झालेल्या या कारवाईमुळे अनिल शिंदे यांना प्रचंड मानसिक धक्का बसल्याचा आरोप करण्यात येत असून, त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने शहरातील आनंद ऋषीजी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर शिंदेंच्या शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत प्रशासन आणि विरोधकांवर गंभीर आरोप केले आहेत. अनिल शिंदे यांच्या निवासस्थानी नेमका कोणत्या कारणासाठी छापा टाकण्यात आला, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. छाप्यात नेमकं काय सापडलं, याबाबतही प्रशासनाकडून मौन पाळण्यात आलं आहे. मात्र निवडणुकीच्या तोंडावर अचानक झालेल्या या कारवाईमुळे अनिल शिंदे यांची प्रकृती खालावल्याचा दावा त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. त्यांच्या पत्नी शीला शिंदे यांनी हा प्रकार केवळ मानसिक त्रास देण्यासाठी करण्यात आल्याचा आरोप करत, प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला आहे. अनिल शिंदे यांची तब्येत अचानक बिघडल्याने त्यांना आनंद ऋषीजी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून, सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांचे रेकॉर्ड तपासा



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १३
शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी मतदान केंद्रांवर नियुक्त असलेल्या अधिकाऱ्यांचे मागील रेकॉर्ड तपासण्याची मागणी केली आहे. पुणे येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी मागील सहा महिन्यांत बदली झालेल्या अधिकाऱ्यांचा सखोल आढावा घेणे आवश्यक असल्याचे म्हटले.

मागील निवडणुकीदरम्यान ज्या भागांमध्ये पैसे वाटप झाले होते, त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची यंदा इतरत्र बदली करण्यात आली असली तरी, त्याच प्रकारचे गैरप्रकार पुन्हा सुरू असल्याचा आरोप डॉ. गोऱ्हे यांनी केला. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रशासकीय अधिकारी आणि पोलिसांची मोक्याच्या ठिकाणी बदली करण्यात येत असून, पोलिसांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता कठोर गस्त घालावी, असे आवाहन डॉ. गोऱ्हे यांनी केले. अन्यथा संघर्ष वाढण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. पैसे वाटून निवडणूक जिंकता येत नाही, असे असते तर काँग्रेस कधीच हरली नसती, असा टोलाही त्यांनी लगावला. पैसे वाटपाबाबत शिवसेनेने पोलिसांकडे तक्रार दाखल केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी निवडणूक आयोगाला आवाहन केले की, मतदारांना मतदान केंद्रात मतपत्रिका देताना मतदानाची प्रक्रिया नीट समजावून सांगावी. यामुळे मतदारांना योग्य पद्धतीने मतदान करण्यास मदत होईल, असे त्यांचे म्हणणे होते.

पुणे महानगरपालिका निवडणुकीबाबत बोलताना डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, शिवसेनेने आरोप-प्रत्यारोप न करता विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. पुण्याला समाजसुधारकांचा मोठा वारसा असून, पुणेरी संस्कृती जपण्यासाठी पक्ष प्रयत्नशील राहील. शहरात कायदा व सुव्यवस्था राखणे आवश्यक असताना काही राजकीय पक्षांकडून ठोस भूमिका घेतली जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

पुणे शहर आणि जिल्ह्यात पर्यटकांची संख्या वाढत असून, गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणावर नागरिक येतात. शहराच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या ब्ल्यू प्रिंटला मनपेत यश मिळाल्यानंतर चालना दिली जाईल, असे त्यांनी सांगितले. शाळा, आरोग्य सुविधा, पायाभूत सोयी आणि समाविष्ट गावांतील दुहेरी कराबाबत ठोस निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

## डंपरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १३
भरधाव डंपरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना नगर रस्त्यावर घडली. या प्रकरणी डंपर चालकाविरुद्ध वाघोली पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवेंद्रराम शेट्टी (वय ४०, रा. कल्पतरु पार्क, बकोरी रस्ता, वाघोली) असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे. याबाबत शेट्टी यांचा भाऊ मंजुनाथ (वय ३५) यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फियार्दीनुसार, डंपरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार देवेंद्र हे पुणे-अहिल्यानगर मार्गावरुन जात होते. केसनंद फाटा परिसरात भरधाव डंपरने दुचाकीस्वार देवेंद्र यांना धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या देवेंद्र यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर पसार झालेल्या डंपरचालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलिसांनी केसनंद फाटा परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले आहे.

# मुंबईतील मराठी माणसाचे महत्व कधीच कमी होणार नाही



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
राज्यातील महायुती सरकार भावनेचे नाही तर विचारांचे आणि विकासाचे राजकारण करीत आहे. ठाकरे बंधूना मात्र निवडणुका आल्या की मराठी आणि मुंबईकरांची आठवण येते. मात्र महापालिकेतील त्यांच्याच राजवटीत मराठी माणूस बाहेर फेकला गेला असून त्यांना सन्मानाने मुंबईत आणणार आहोत असे सांगतानाच मुंबईला कोणीही तोडू शकणार नाही आणि या शहरातील मराठी माणसाचे महत्वही कधी कमी होणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी दिली.

मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ शिवाजी पार्क येथील जाहीर सभेत शिंदे बोलत होते. आजची सभा मुंबईतील परिवर्तनाची नांदी असून मुंबई महापालिकेवर महायुतीचा भगवा फडकणार आणि मराठी महापौर होणार असा प्रारंभीच दावा करुन शिंदे यांनी आपल्या भाषणात ठाकरे बंधू यांना लक्ष्य केले. मुंबईकरांना भावनेचे नव्हे तर विकासाचे राजकारण अपेक्षित असून विकसीत मुंबईचे बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न साकार करण्याचा महायुतीचा निर्धार असल्याचेही त्यांनी सांगितले.

निवडणुका आल्यानंतर ठाकरे बंधूना मराठी, मुंबई संकटात असल्याची आठवण होते. मात्र महापालिकेतील तुमच्या सत्ताकाळात मराठी माणसासाठी काय केले अशी विचारणा करीत तुमच्यामुळेच मराठी माणूस मुंबईबाहेर फेकला गेल्याचा आरोप शिंदे यांनी केला.

मुंबईबाहेर फेकला गेलेल्या मराठी माणसाला पुन्हा सन्मानाने मुंबईत आणण्यासाठी आणि त्यांना रोजगार, घर देण्याचा सरकारचा निर्धार असून त्यासाठी गेल्या साडेतीन वर्षात २० हजार इमारतींना वापर परवाना दिला. मुंबई पगडीमुक्त केली. खड्डेमुक्त मुंबई, झोपडपट्टीमुक्त मुंबई, १२ हजार गिरणी कामगारांना घरे देण्याचे भरीव काम केल्याचा दावा शिंदे यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी अदानी कंपनीवर मेहेरनजर दाखवत असल्याच्या ठाकरे बधूंच्या आरोपांचा समाचार घेताना, पंतप्रधानांनी गेल्या १० वर्षात १० लाख कोटी दिले असून, सत्तेत असताना तुम्हीच अदानी कंपनीस धारावी आणि नवी मुंबई विमातळ प्रकल्प दिलात.

महाराष्ट आणि मुंबईच्या हितासाठी एकत्र आल्याचा ठाकरेंच्या दाव्याची खिल्ली उडवताना, २० वषार्पूर्वी वेगळे का झालात, बाळासाहेबांच्या स्वप्नापेक्षा पैसा,स्वार्थ मोठा मानलात. त्यावेळीही स्वाथार्साठी दूर झालात आणि आत्ताही स्वाथार्साठीच एकत्र आलात हे मुंबईकर जाणत असून त्यांच्या या भूलथापांपासून मराठी माणसाने सावध रहावे असे आवाहनही शिंदे यांनी केले.

# लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा




■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
राज्यातील लाडक्या बहिणींना संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर मोठा दिलासा मिळाला असून, यंदाच्या महिन्यातील 1500 रुपयांचा हफ्ता आजपासून त्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा होऊ लागला आहे. सकाळपासूनच अनेक महिलांच्या मोबाईलवर बँक मेसेज येऊ लागल्याने या योजनेचा लाभ प्रत्यक्षात सुरू झाल्याचे चित्र आहे. राज्यात सध्या महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना आणि आदर्श आचारसंहिता लागू असताना, निवडणूक आयोगाने नियमित लाभ देण्यास परवानगी दिल्यामुळे हा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, एकरकमी तीन हजार रुपये देण्याच्या चर्चांना आयोगाने स्पष्टपणे मज्जाव केल्याने या निर्णयाला राजकीय तसेच प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू आहे. या काळात कोणत्याही नव्या योजना, नवीन लाभार्थी किंवा मतदारांना आकर्षित करणाऱ्या घोषणा करण्यास मनाई असते. याच कारणामुळे लाडकी बहीण योजनेअंतर्गत जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरूपात देण्यास राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट नकार दिला. मात्र, आधीपासून सुरू असलेल्या आणि नियमित स्वरूपातील लाभ देण्यास आयोगाने परवानगी दिली. त्यामुळे डिसेंबर महिन्याचा 1500 रुपयांचा हफ्ता आजपासून लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांमध्ये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

दरम्यान, मकर संक्रांतीच्या निमित्ताने 14 जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे मिळून 3000 रुपये जमा होणार, अशा आशयाच्या बातम्या आणि सोशल मीडियावरील पोस्टमुळे मोठा गोंधळ निर्माण झाला होता. या दाव्यांच्या आधारे राज्य निवडणूक आयोगाकडे विविध तक्रारी दाखल झाल्या. काही राजकीय पक्ष आणि नागरिकांनी हा प्रकार आचारसंहितेचा भंग ठरतो का, असा सवाल उपस्थित केला. याची दखल घेत राज्य निवडणूक आयोगाने थेट मुख्य सचिवांकडे याबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते.

मुख्य सचिवांनी सादर केलेल्या अहवालात महत्त्वाची बाब स्पष्ट करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाने 4 नोव्हेंबर 2025 रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशानुसार, निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्यक्ष सुरू झालेल्या विकासकामे व योजना आचारसंहिता काळात सुरू ठेवण्यास परवानगी आहे.

## किशोरी शहाणे यांच्या गाडीचा अपघात

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १३ :
हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री किशोरी शहाणे यांना नुकत्याच अपघाताचा सामना करावा लागला आहे. या घटनेनंतर किशोरी शहाणे यांनी त्यांच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवर व्हिडीओ शेअर करून माहिती दिली आणि त्यांच्या संतापाची भावना व्यक्त केली. माहितीनुसार, किशोरी शहाणे सकाळी शुटिंगसाठी निघाल्या होत्या. शहरातील सकाळी सर्वत्र ट्राफिक असल्याने प्रवास करताना त्यांच्या गाडीला दुसऱ्या वाहनाचा जोरात धक्का बसला. या धडकेत त्यांच्या गाडीच्या उजव्या बाजूचा साइड मिरर पूर्णपणे तुटला. मात्र सुदैवाने, अपघातात कुणालाही गंभीर इजा झाली नाही. साइड मिरर तुटल्यामुळे गाडी चालवण्यात त्रास झाल्याने किशोरी शहाणे यांनी व्हिडीओच्या माध्यमातून सोशल मीडियावर संताप व्यक्त केला.

## वर्षभरात 10 हजारांहून अधिक रक्त पिशव्यांचे संकलन

### अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाचा ऐतिहासिक टप्पा

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 13)**- अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तकेंद्र व रक्तघटक विलगीकरण केंद्राने रुग्णसेवेत महत्त्वपूर्ण कामगिरी करत सन 2025 मध्ये 10 हजार 190 रक्तपिशव्यांचे संकलन केले आहे. गेल्या चार वर्षांत या केंद्राने 40 हजारांहून अधिक रक्तपिशव्यांचे संकलन करून हजारो रुग्णांना जीवनदान दिले आहे. यावर्षी 227 रक्तदान शिबिरे यशस्वीपणे पार पडली असून, सिकलसेल, थॅलेसिमिया, हिमोफिलिया तसेच जटिल शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना मोठा आधार मिळाला आहे. जिल्ह्यातील एकमेव शासकीय रक्तपेढी म्हणून हे केंद्र शासकीय व खासगी रुग्णालयांना तसेच सहा रक्तसाठवणूक केंद्रांना नियमित रक्तपुरवठा करते.



मेळघाटातील आदिवासी बांधव, गर्भवती माता व ॲनिमियाग्रस्त रुग्णांसाठी हे केंद्र अत्यंत महत्त्वाचे ठरते. 365 दिवस रक्तदान मोहिमेअंतर्गत डॉ. अनिल बोंडे, डॉ. दिलीप सौंदळे, डॉ. सुरेश आसोले व डॉ. आशिष वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य सुरू आहे. सामाजिक संस्थांनी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रचाराचा धुरळा ओसरला, निवडणूक यंत्रणा सज्ज

## 15 जानेवारीला मतदान, 16 जानेवारीला मतमोजणी; कडक पोलीस बंदोबस्त

- 805 मतदान केंद्रांवर 6.77 लाख मतदार करणार मतदान,
- पारदर्शक व निर्भय वातावरणात निवडणूक पार पाडण्याचा निर्धार



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,(दि.13)** - अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीचा मंगळवार (दि.13 ) रोजी प्रचाराचा धुरळा ओसरताच, प्रशासनाने दि. 15 जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाविषयीच्या तयारीची माहिती दिली. तसेच शुक्रवार, दि. 16 जानेवारी रोजी नवसारी रोडवरील डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडा संकुलात सात झोननुसार मतमोजणी केली जाणार आहे. त्याआधी दि. 14 जानेवारी रोजी सातही झोननुसार मतपेट्यांचे व निवडणूक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. महानगरपालिका क्षेत्रातील 22 प्रभागांमध्ये 231 इमारतींमधील एकूण 805 मतदान केंद्रांवर मतदान होणार असून 87 नगरसेवकांच्या निवडणुकीसाठी 661 उमेदवार रिंगणात आहेत. शहरात 6,77,180 मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

### पोलीस प्रशासनाची व्यापक तयारी

निवडणूक शांततेत व पारदर्शकपणे पार पडावी यासाठी प्रशासन व पोलिसांनी व्यापक तयारी केली आहे. निवडणुकीदरम्यान एफएसटी-08, व्हीएसटी-08 व एसएसटी-10 पथके कार्यरत राहणार आहेत. तसेच 3 पोलीस उपायुक्त, 7 सहाय्यक पोलीस आयुक्त, 31 पोलीस निरीक्षक, 1,650 पोलीस कर्मचारी, 900 होमगार्ड, एक एसआरपीएफ कंपनी, आरसीपी व क्यूआरटी पथके तैनात असतील. शहरात 37 सेक्टर पेट्रोलिंग पथके सतत गस्त घालतील.

### निर्भयपणे मतदान करा-आयुक्त

महापालिका आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तयारी पूर्ण झाली आहे. दि. 13 जानेवारी रोजी सायंकाळी 5.30 नंतर कोणत्याही प्रकारचा प्रचार करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच दि. 15 जानेवारी रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत सर्व नागरिकांनी निर्भयपणे व मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

### गैर प्रकार रोखण्यासाठी सायबरही सक्रीय

सोशल मीडियावरील अफवा व गैरप्रकारांवर सायबर पोलीस विशेष लक्ष ठेवणार आहेत. आचारसंहितेदरम्यान मोठ्या प्रमाणात दारू, अमली पदार्थ, गुटखा तसेच शस्त्रसाठा जप्त करण्यात आला असून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

## महानगरपालिका मतमोजणीमुळे 15 व 16 जानेवारीला वाहतुकीत अंशतः बदल

### मतमोजणी केंद्र परिसरातील मार्ग बंद, पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन

**अमरावती, (दि.13)** - अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-2026 ची मतमोजणी शुक्रवार, दि. 16 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजेपासून डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडा व वाणिज्य संकुल, नवसारी, अमरावती येथे होणार आहे. त्यापूर्वी गुरुवार, दि. 15 जानेवारी 2026 रोजी मतदानानंतर ईव्हीएम, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट आदी साहित्य घेऊन येणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ मतमोजणी केंद्र परिसरात राहणार आहे.

तसेच 16 जानेवारी रोजी सकाळी 8 वाजेपासून अधिकारी, कर्मचारी, उमेदवार व मतमोजणी प्रतिनिधी मोठ्या संख्येने दाखल होणार असल्याने वाहतूक कोंडी, अपघात तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीचे सुरळीत नियोजन करण्यासाठी काही मार्गांवर वाहतूक बंद ठेवून ती पर्यायी मार्गांनी वळविण्यात येणार आहे. प्रवेशबंदीचा मार्ग कठोरा ते छत्रपती संभाजी राजे चौक (राजपूत धाबा चौक) असा राहील. हा आदेश गुरुवार, दि. 15 जानेवारी 2026 रोजी रात्री 10 वाजेपासून ते शुक्रवार, दि. 16 जानेवारी 2026 रोजी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लागू राहणार आहे. पंचवटीकडून नवसारीकडे जाणाऱ्या वाहनांनी कठोरा नाकाङ्करंगोली लॉनङ्ककठोरा जकात नाका या मार्गाचा वापर करावा. राजपूत धाबाकडून पंचवटीकडे येणाऱ्या वाहनांनी राजपूत धाबाङ्करिंग रोडङ्कपोटे पाटील चौकङ्ककठोरा नाका किंवा राजपूत धाबाङ्करिंग रोडङ्कपोटे पाटील चौकङ्करहाटगाव टी पॉईंट या मार्गांचा अवलंब करावा. पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी मुंबई पोलीस कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार हा आदेश जारी केला आहे. अत्यावश्यक परिस्थितीत जनहित लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) यांना वाहतूक नियमनात अंशतः बदल करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

## नयन वायधने हत्याप्रकरणातील मुख्य सूत्रधार अटकेत

### दोन सख्खे भाऊ पोलिसांच्या ताब्यात



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,(दि.13)** - गांधी आश्रम परिसरात घडलेल्या नयन नरेंद्र वायधने (वय 17 वर्षे 6 महिने, रा. हनुमान नगर) यांच्या निर्घृण हत्याप्रकरणातील मुख्य सूत्रधार असलेल्या दोन सख्ख्या भावांना खोलापुरीगेट डीबी पथकाने अवघ्या 12 तासांत अकोट येथून अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सागर तायडे (वय 36) व दीपक तायडे (वय 38) यांचा समावेश आहे. या प्रकरणात यापूर्वीच तीन महिलांना अटक करण्यात आली होती.

रविवार, 11 जानेवारी रोजी दुपारी 12.05 वाजताच्या सुमारास गांधी आश्रम चौकात जुन्या वादातून आरोपींनी नयनवर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. प्रत्यक्षदर्शींनुसार त्याच्यावर 7 ते 8 वेळा वार करण्यात आले. गंभीर अवस्थेत नयनला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेनंतर डीबी पथकाने गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी अकोट येथे लपल्याचे निष्पन्न करून त्यांना अटक केली. सोमवारी न्यायालयात हजर केले असता आरोपींना 16 जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सर्व आरोपी ताब्यात आल्याने तपासाला वेग आला असून पुढील महत्त्वाचे खुलासे होण्याची शक्यता आहे.

## कोर्टाचा आदेशही धुडकावला?

### वयोवृद्ध कर्मचाऱ्याची ग्रॅच्युइटी 13 वर्षांपासून रखडलेली

महासागर प्रतिनिधी

**अमरावती,(दि.13)** - पेमेंट ऑफ ग्रॅच्युइटी ॲक्ट, 1972 अंतर्गत मंजूर झालेली ग्रॅच्युइटी व त्यावरील व्याज मिळण्यासाठी कादर खान सत्तार खान या वयोवृद्ध कर्मचाऱ्याला गेल्या 13 वर्षांपासून न्यायालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. लेबर कोर्ट, अमरावती यांनी स्पष्ट आदेश दिले असतानाही जिल्हा परिषद अमरावतीकडून अद्याप रक्कम अदा करण्यात आलेली नाही.कादर खान यांनी दावा दाखल केला होता. या प्रकरणात न्यायालयाने 3,33,024 इतकी ग्रॅच्युइटी तसेच 1 एप्रिल 2012 पासून 10 टक्के वार्षिक व्याज देण्याचे आदेश दिले. मात्र प्रशासनाच्या दिरंगाईमुळे हा आदेश अद्याप प्रत्यक्षात उतरलेला नाही. न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने त्यांनी वसुली अर्ज दाखल केला. त्यावर 3 एप्रिल 2025 रोजी लेबर कोर्टाने जिल्हा परिषद अमरावतीविरोधात थेट रिकव्हरी सर्टिफिकेट जारी करण्याचे आदेश दिले असून या आदेशावर कोणतीही स्थगिती नाही. 'कोर्टाने माझ्या बाजूने निकाल दिला, तरीही मला माझेच पैसे मिळत नाहीत,' अशी व्यथा कादर खान यांनी व्यक्त केली. या प्रकरणामुळे न्यायालयीन आदेशांच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### कुऱ्हाडीने हल्ला

**अमरावती** - तिवासा पोलीस स्टेशन परिसरातील जावरा फतेहपूर येथील रहिवासी संदीप गणेश भागवत याला गायीवरील वादातून विकी अशोक लांडे (28) यांनी कुऱ्हाडीने जखमी केले. संदीपच्या तक्रारीवरून पोलिसांनी शनिवारी विकी लांडेविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पुढिल तपास पोलिस करीत आहे.


ग्राम पंचायत कार्यालय कारादा (ब) पंचायत समिती धारणी जि. प. अमरावती

जाहीर निविदा सूचना

ग्रा.प.कार्यालय कारादा (ब) ता. धारणी जि अमरावती यांच्या मार्फत सन २०२४-२५ वर्षाकरीता विकास कामाचे प्राप्त निधीतून खालील कामाचे मोहरबंद बी १ टक्केवारी प्रमाणणमध्ये जि. प. बांधकाम विभाग अमरावती यांचे नोंदणीकृत कंत्रादाराकडून मागविण्यात येत आहे. को-या निविदा बंद लिफाफा ग्राम पंचायत कार्यालयत सादर करावे.

| अ. क्र | योजनेचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | निविदा फी | कामाची कालाधी | निविदा उचलने सादर करण्याच्या दि. वेळ व ठीकाण | निविदा उघडण्याचा दि. वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | स्वच्छ भारत मिशन | CONSTRUCTION OF COMMUNITY SANITORY COMPLEX | 300000 | 01 टक्का | २०० रु | ०३ महीने (९० दिवस) | १२/०१/२०२६ ते २०/०१/२०२६ दु १२.०० वाजे पर्यंत ग्राम पंचयात कार्यालय | २१/०१/२०२६ ते २३/०१/२०२६ या कालावधी मध्ये ग्रा. पं. मासिक सभेला ला कार्यालयीन वेळेत |

टीप:- निविदा उघडण्याची दि वेळ व नोटिस द्वारे कळविण्यात येईल.

निविदा बाबत शर्ती व अटी –

१. निविदा दोन लिफाफा पद्धती नुसार सादर कारवायाच्या आहेत.
२. निविदा मंजूर झाल्या नंतर कामाचा करारनामा रु ५०० /- च्या स्टमप पेपरवर कंत्रातदारस द्यवा लागेल.
३. काम पूर्ण झाल्या नंतर पूर्णताच्या दाखला प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.
४. कामाच्या सर्व खर्च शासकीय कपात देयकाच्या रक्कमेतून कपात करण्यात येईल.
५. निविदा संबंधी सर्व अधिकार रद्द करणे व स्वीकारणे बाबतचे सर्व अधिकार ग्रामपंच्यातीने राखून ठेवले.
६. इतर अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय नोटिस बोर्ड वर लावण्यात आले आहे.

सरपंच/सचिव

ग्रा. पं. कार्यालय कारादा



महानगरपालिका निवडणूक - २०२५ - २६

आपलं एक मत ठरविणार




मतदान दि १५ जानेवारी २०२६
वेळ - सकाळी ७:३० ते सायं ५. ३०

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

MaharashtraSEC

कर मतदान...
सांगतंय संविधान!

# आणि म्हणून' नावाचे तुणतुणे वाजतच राहिले!





थर्ड अम्पायर
जयंत महाजन
९४२०६११४२०

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नाशिक येथील गोल्फ क्लब मैदानात जाहीर सभा पार पडली. एकनाथ शिंदे यांनी सभा का घेतली? असा त्यांना स्वतःला प्रश्न पडला असेल. कारण संपूर्ण सभा संपेपर्यंत अर्ध्या तासाच्या आत किमान हजार वेळा 'आणि म्हणून' हा शब्दप्रयोग ते अत्यंत कंटाळवाण्या स्वरात बोलत होते. ते बोलायच्या आताच जनतेतून 'आणि म्हणून' आवाज येत होता. त्यामुळे उशिरा सुरू झालेली त्यांची अर्ध्या तासाची सभा मनोरंजन करणारीच ठरली. विधानसभा निवडणुकीत झालेल्या विजयात नाशिककरांचे मोठे योगदान असल्याचे सांगून पून्हा एकदा नाशिककरांना साद घातली. येथे बारा ज्योतिलिंगपैकी त्र्यंबकेश्वर आहे, साडेतीन पिठा पैकी सप्तशृंगी माता आहे आणि काळाराम मंदिरात राम आहे 'आणि म्हणून' अशा या पवित्र भूमीमध्ये तुम्ही राहत आहे. तुम्ही भाग्यवान आहात आणि मी देखील आज येथे आलो आहे, मी देखील भाग्यवान आहे. शिवसेनेला आणि महायुतीला या नाशिककरांनी विधानसभेच्या निवडणुकीमध्ये एक अद्भुत यश मिळवून दिले, असे सांगताना वारंवार त्यांच्या मुखातून 'आणि म्हणून' 'आणि म्हणून' असे वाक्य येतच राहिले. त्यामुळे सभा गांभीर्याने घेण्याऐवजी अनेकांनी विनोदाने ऐकणे पसंत केले. एकनाथ शिंदे म्हणाले, १५ पैकी १४ आमदार महायुतीचे निवडून आले हा रेकॉर्डब्रेक इतिहास झाला. या इतिहासामध्ये नाशिककरांचे मोठे योगदान आहे. तेव्हा मी म्हणालो होतो मी निवडून आल्यानंतर निवडणूक झाल्यानंतर विजयाचा गुलाल उधळायला येईल. दिलेला शब्द पाडणारा एकनाथ शिंदे आहे. फक्त गुलाल नाही तर या संपूर्ण मतदार राजाचे आभार मानायला मी या ठिकाणी आलो आहे. तुम्हाला धन्यवाद द्यायला या ठिकाणी आलो आहे. नाशिक हे भक्तांचे ठिकाण मानले जाते आणि मी देखील नाशिककरांचा भक्त झालो आहे. नाशिक पासून खाली शहादा अक्कलकुवा पर्यंत शिवसेनेचा भगवा फडकला आहे. ही कमाल लाडक्या बहिणींची आहे. लाडक्या भावांची आहे, लाडक्या शेतकऱ्यांची आहे, या लाडक्या ज्येष्ठांचे आहे. शिवसेनेवर तुम्ही विश्वास टाकला हे मी स्वतःचे भाग्य समजतो 'आणि म्हणून' नाशिककरांचा आभार मी कसे मानू, कुठल्या शब्दात मानवे हे मला सुचत नाही. त्यांच्या भाषणात कुठलाही विकासही नव्हता आणि कुठला कार्यक्रमही दिसला नाही. अलीकडच्या काळात सभांना होणारी गर्दी कशी असते, हे सांगण्याची गरज नाही. त्याप्रमाणे सभेला नेहमीप्रमाणे गर्दी झालीच होती. ती काही फक्त एकनाथ शिंदे यांच्या सभांनाच नव्हे; तर त्या ठिकाणी कुणाचीही सभा असती तरी तेवढीच गर्दी झाली असती. एका दिवसाचा रोज तीन चार तासासाठी जर मिळत असेल तर सभेला कोण येणार नाही? गरिबीला अनेक मर्यादा असतात. त्या मयार्दांचा फायदा घेऊन राजकीय पक्ष स्वतःची पोळी भाजून घेत असतात. परंतु अशा सभांना काही वैचारिक पातळी असलेला वर्ग देखील हजार असतो. तो गांभीर्याने सभा ऐकत असतो. परंतु त्या सभेत काहीतरी बोलायचे म्हणून बोलायचे 'आणि म्हणून' अशीच वाक्य ऐकायची असेल, तर या सभांना जाण्यात अर्थ तरी काय? मुंबईच्या शिवाजी पार्कवर नुकत्याच झालेल्या सभेतही 'आणि म्हणून'चा गजर मोठ्या प्रमाणावर झाला. उद्धव ठाकरेंवर हीनकस टीका करणे या व्यतिरिक्त एकनाथ शिंदे यांच्या भाषणात काहीही दम नसतो. मात्र देवेंद्र फडणवीस आणि भाजपला खुश करायच्या नादात तेच तेच मुद्दे सांगितले जातात. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्याबरोबर ज्या ज्या ठिकाणी सभा घेतात, त्या त्या ठिकाणी मात्र मुद्देसूद व विकासात्मक भाषा वापरून जनतेची मने जिंकतात. त्यामुळे आपोआप अशा सभेत एकनाथ शिंदे यांच्या सभेचे मूल्य कमी कमी होत जाते. त्यांना कुणी सल्लागार असेल, तर त्यांना भाषाही शिकविली जात नाही.

जगातल्या ३२ देशांनी आपली नोंद घेतली असे दर्पोक्तीयुक्त उद्गार काढून एकनाथ शिंदे स्वतःचे मूल्य कमी करीत आहे असे दिसते. बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघेंच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनगटात दुनिया बदलण्याची ताकद आहे, याबाबत आक्षेप घेण्याचे कारण काही नाही.

'शिवसेनेचे खच्चीकरण होऊ लागले होते, ते आम्हाला बघवले नाही. शिवसेना आणि धनुष्यबाण काँग्रेसच्या दारात गहाण टाकली, म्हणून आपण बंड केले याची अनेक उदाहरणे भाषणातून देऊन उपयोग काय? कारण बंड का व कशासाठी केले याचे सत्य जनतेपर्यंत यापूर्वीच पोहोचले होते. बाळसाहेबांचे आशीर्वाद, आनंद दिघे साहेबांचे आशीर्वाद आणि तमाम शिवसैनिकांचे आशीर्वाद आहेत, म्हणून हा एकनाथ शिंदे लढला आणि जिंकला.

अडीच वर्ष पायाला भिंगरी लावून हा एकनाथ शिंदे लढला, न झोपता देखील या तुमच्या एकनाथ शिंदेने काम केले. या महाराष्ट्रात अडीच वर्ष ज्यांनी सगळे बंद करून ठेवले होते अडीच वर्षांपूर्वी जलयुक्त शिवार मराठवाडा वॉटर ग्रीड हे सगळं बंद करून ठेवले होते. महाविकास आघाडीने सगळे काही बंद करून ठेवले होते. घरात बसा, फेसबुक लाईव्ह करा, मंदिरे बंद, गरम पाणी प्या, असे करून काम होते का? फेस टु फेस काम करावे लागते. लोकांमध्ये जाऊन काम करावे लागते, अशी स्वतःचीच कर्तबगारी सांगून एकनाथ शिंदे फार पुढे जातील असे वाटत नाही.

महाराष्ट्रात राजकारण करताना आत्मकेंद्रीत राजकारण नसावे ज्यांच्याबरोबर ते राजकारण करतात त्या देवेंद्र फडणवीस व दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडून त्यांनी खरोखर काहीतरी शिकले पाहिजे. उद्धव ठाकरे यांच्याकडून ज्या काही चुका झाल्या त्याचे शिक्षा त्यांना पुरेपूर मिळाली. याचा अर्थ वर्षानुवर्षे फक्त उद्धव ठाकरे हा एकच विषय डोळ्यासमोर ठेवून राजकारण करणे योग्य ठरणार नाही.

एखाद्या गोष्टीचे आव्हान द्यायचे झाले तर असे केले नाहीतर गावाकडे शेती करणार, मला हलक्यात घेऊ नका, ही भाषा आता त्यांनी बंद केली पाहिजे. विधानसभेला ८० जागा लढून ६० जागा त्यांनी जिंकल्या ही वस्तुस्थिती खरी आहे. याचा अर्थ तीच स्थिती कायम राहिल असे नव्हे. मी एका शेतकऱ्याचा मुलगा आहे. एक शेतकऱ्याचा मुलगा या राज्याचा मुख्यमंत्री झाला. पण मी कार्यकर्ता म्हणून काम केले. कालही कार्यकर्ता म्हणून काम केलं. आजही कार्यकर्ता म्हणून काम करत आहे आणि उद्याही कार्यकर्ता म्हणून काम करणार आहे, असे सांगताना 'त्या' शेतकऱ्याच्या मुलाला राजकारणात कोणी व किती उंचीवर संधी दिली हे पण त्यांनी सांगितले पाहिजे.

शेतकऱ्याचा मुलगा मुंबईत येतो, रिक्षा चालवतो, बाळासाहेब ठाकरे त्यांना आपल्या जवळ बोलवतात. राजकारणात संधी देतांना पदावर पदे देतात. त्यांना स्वतःलाच नव्हे तर कुटुंबातील माणसांना संधी देतात. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यावर सतत टीका करताना काही गोष्टींचे भान त्यांना ठेवले पाहिजे.

जनतेमध्ये ही चर्चा सतत असते. कारण एवढा कृतघ्नपणा पण चांगला नसतो. एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील सरकार तोडले आणि भाजप सोबत सत्तेची नवी जोडी केली. यामुळे पक्षभक्ती आणि राजकीय नैतिकतेबद्दल कायम प्रश्न उपस्थित राहणार आहे. मंत्री गणेश नाईक यांच्याकडून त्यांच्यावर कोणते क्षणी राजकीय हल्ला होऊ शकतो तो हल्ला परतवणे त्यांना कठीण जाऊ शकते.

कॉमेडियन कुणाल कामरा यांच्या विनोदावरून पक्षाच्या काही कार्यकर्त्यांनी स्टुडिओत पोकळपणा करत हल्ला केल्याचे प्रकरण समोर आले होते. यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत त्यांची भूमिका महाराष्ट्राला माहीत झाली. त्यांच्या भावाकडे ड्रग्स प्रकरणाशी संबंध असल्याचा आरोप झाला.

विरोधकांनी शिंदे यांच्या भावाचे नाव ड्रग्स प्रकरणाशी संबंधित असल्याचा आरोप केला आहे आणि त्याची चौकशी मागितली आहे. शिंदे कुटुंबाचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांनी हा आरोप नाकारला आहे. ते सत्तेवर आहे म्हणून प्रकरण मिटणार याबद्दल जनतेला देखील खात्री आहे. परंतु त्यामुळे आपलेही पाय मातीचे आहे, याची जाणीव त्यांना होईल की नाही शंका वाटते.

एकनाथ शिंदे यांच्याकडे सत्ता असल्यामुळे सध्या तरी त्यांची पाचही बोटे तुपात आहे. त्यामुळे त्यांना तशी काळजी करण्याची गरज नाही. परंतु त्यांच्यासारख्या तळागाळातून आलेल्या कार्यकर्त्याने 'जरा सबुरीने' घेण्याची गरज व्यक्त होत आहे!

---

### अरावली संकटात विकासाच्या नावाखाली

# वाळवंटीकरणाला मोकळा रस्ता?

**(कालच्या अंकावरून पुढे)**

**विकास परसराम मेश्राम**
**मु+पो, झरपडा,**
**ता. अर्जूनी/मोर, जि. गोंदिया.**
**7875592800**
vikasmeshram04@gmail.com

टीकाकारांच्या मते, ही व्याख्या अवैज्ञानिक, मनमानी आणि जागतिक मानकांशी विसंगत आहे. समुद्रसपाटी हे सार्वत्रिक मोजमाप आहे, तर स्थानिक तल मनमानी ठरते. या व्याख्येमुळे राजस्थानमधील सुमारे 90 टक्के टेकड्या अरावलीच्या बाहेर जातील.

भारतीय वन सर्वेक्षणानुसार, 12,081 टेकड्यांपैकी केवळ 1,048 टेकड्याच या निकषात बसतात.खरं तर एवढंच आहे की मुख्य आवश्यक खनिजांचे अतिविशाल प्रमाणावर होणारे उत्खनन गंभीर पर्यावरणीय परिणाम घडवून आणते.

त्यामुळे फक्त कडक नियमांचीच नव्हे, तर निसर्गाने मानवाला दिलेल्या परिसंस्था सेवांचे आर्थिक मूल्यांकन करण्याचीही नितांत गरज आहे. या प्रक्रियेचे सामाजिक परिणामही असतात; मात्र त्यांचे मोजमाप करण्यासाठी कोणतेही ठोस मापदंड आज अस्तित्वात नाहीत. अशा परिस्थितीत धोरणकर्त्यांकडून चूक होणारच असेल, तर ती चूक लोकांच्या आणि पर्यावरणाच्या हिताच्या बाजूने असावी.

याचप्रमाणे, जेव्हा हिमालयातील हिमनद्या वितळू लागल्या, तेव्हा या प्रक्रियेला ह्यजलवायू आपत्तीह्ळ ठरवणाऱ्या दाव्यांनाच आव्हान देणारा एक कथानक उभा करण्याचा प्रयत्न झाला. सुदैवाने, आता जग हिमनद्यांच्या वितळण्यामुळे होणाऱ्या विध्वंसक परिणामांबाबत जागे झाले आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या टप्प्यापुढे जाऊन जग आधीच ह्यग्लोबल बॉइलिंगह्ळच्या अवस्थेत प्रवेश करत आहे. याचा अर्थ असा की डोंगररांगा आणि जंगलांचे अमर्याद शोषण सुरू आहे, जे संपूर्ण जगाला जलवायू आपत्तीच्या दिशेने ढकलत आहे.

गुजरात, राजस्थान, हरियाणा आणि दिल्ली या चार राज्यांतील ३७ जिल्ह्यांमध्ये सुमारे १.४४ लाख चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या अरावली पर्वतरांगेत शिसे, जस्त, चांदी, तांबे आणि अर्थातच संगमरवर यांसारख्या प्रमुख खनिजांचा प्रचंड साठा आहे. या पर्वतरांगेत लिथियम, निकेल, मोलिब्डेनम, नायोबियम आणि टिन यांसारखी खनिजेही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

जसे डोंट लुक अप या चित्रपटात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना एका धूमकेतूमधील प्रचंड आर्थिक संपत्ती देशाला अमाप श्रीमंती देईल, असा विश्वास दिला जातो, तसेच अरावलीतील खनिजसंपदा देशाच्या आर्थिक विकासासाठी अत्यावश्यक असल्याचे गृहित धरले जात आहे. जर तसेच असेल, तर मग सेव्ह अरावलीसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर आंदोलने का होत आहेत, हे मला समजत नाही. खनिज संपत्तीची आर्थिक किंमत लोकांना कळत नाही का, जी कोणत्याही परिस्थितीत बाहेर काढणे आवश्यक आहे?

एक अब्ज वर्षांहून अधिक काळ अस्तित्वात असलेल्या अरावली पर्वतरांगेने उत्तर-पश्चिम भारतात वाळवंटीकरण रोखण्यासाठी हिरव्या भिंतीचे काम केले आहे. या पर्वतरांगा समृद्ध जैवविविधतेचे भांडार आहेत; भूगर्भातील जलसाठ्यांचे पुनर्भरण करण्यात त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे.

दिल्ली, हरियाणा व उत्तर प्रदेशात वाळवंटाचा विस्तार होऊ नये यासाठी त्यांनी आजवर प्रभावी अडथळा निर्माण केला आहे. मात्र अरावली पट्ट्यात मानवी हस्तक्षेप आणि विकासाच्या प्रक्रियांमुळे वन्यजीवांचे अधिवास आणि स्थानिक लोकांच्या उपजीविकेला आधीच मोठा फटका बसलेला आहे. जसा-जसा वाळवंटाचा विस्तार वाढत आहे, तसा देशाने मोठ्या मेहनतीने मिळवलेली अन्नसुरक्षा धोक्यात येत आहे.

फेब्रुवारी २०२५ मध्ये संसदेला सांगण्यात आले की भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने तयार केलेल्या २०२१ च्या भारतातील वाळवंटीकरण आणि भूमीक्षय नकाशानुसार, वाळवंट झपाट्याने अन्नधान्य पिकवणाऱ्या कृषी जमिनींकडे सरकत आहे. आधीच हरियाण्यात ३.६४ लाख हेक्टरहून अधिक, पंजाबमध्ये १.६८ लाख हेक्टर आणि उत्तर प्रदेशात १.५४ लाख हेक्टर जमीन भूमीक्षय आणि वाळवंटीकरणाच्या विळख्यात सापडलेली आहे.

एकदा अरावलीचे स्वरूप नव्या परिभाषेनुसार बदलले, तर भूमीक्षयाची प्रक्रिया आणखी वेगाने होईल. यामुळे उष्ण वारे, वारंवार धुळीची वादळे आणि वाढते तापमान यांचा मार्ग मोकळा होईल. त्यासोबतच, शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर उपसल्या जाणा?्या भूगभार्तील पाण्यामुळे मातीचे अपरदन अधिक तीव्र होईल आणि परिणामी कृषी जमिनींची गुणवत्ता गंभीररीत्या खालावेल.

अरावलीसाठी प्रस्तावित नव्या निकषांवरील चर्चा जिथे खनन आणि पर्यावरण या मुद्द्यांभोवती फिरत आहे, तिथे दीर्घकालीन अन्नसुरक्षेसमोरील उभा राहणारा धोका पूर्णतः दुर्लक्षित केला जात आहे. वाळवंटीकरणाविरोधातील संयुक्त राष्ट्र अधिवेशनाने स्पष्ट इशारा दिला आहे की वाळवंटीकरणामुळे मातीची सुपीकता मोठ्या प्रमाणावर नष्ट होते आणि सुपीक जमिनी अर्धशुष्क प्रदेशात रूपांतरित होतात.

त्यामुळे हे स्पष्ट आहे की वाळवंटीकरण हा इतका गंभीर प्रश्न आहे की तो केवळ दावे आणि आश्वासनांपुरता मर्यादित ठेवता येणार नाही. नवीन व्यवस्थापन आराखडे राबवण्याची आणि ह्यमजबूत संरक्षणाह्ळची आश्वासने देणे अपुरे ठरणार आहे.

निश्चितच, अरावली पर्वतरांगा केवळ रणनीतिक खनिजांचा साठा नाहीत; त्या प्रचंड प्रमाणात परिसंस्था सेवा देखील पुरवतात. निसर्गाकडून मिळणाऱ्या या पर्यावरणीय आणि परिसंस्थात्मक सेवांची खरी आर्थिक किंमत आजवर मोजली गेलेली नाही. एकदा या सेवांचे मोल ठरले, की राष्ट्राला या पर्वतरांगा जपून ठेवण्याची आर्थिक गरज स्पष्टपणे जाणवेल जरी खनिज उत्खननाच्या तात्कालिक आर्थिक फायद्यांवर अधिक भर दिला जात असला, तरीही.

ही संपूर्ण प्रक्रिया खनन ह्यनियंत्रितह्ळ करण्याच्या नावाखाली त्याला कायदेशीर मान्यता देणारी आहे. दिल्ली-हरियाणा भागातील छोट्या टेकड्यांकडे रिअल इस्टेट क्षेत्राचे लक्ष आहे. एकदा अरावलीचा काही भाग कायदेशीर व्याख्येतून वगळला, की बाजारप्रेरित शक्तींना पर्यावरण, सांस्कृतिक वारसा आणि मानवी कल्याण याची पर्वा न करता नफा कमावण्याची संधी मिळते.

म्हणूनच, जगातील सर्वात प्राचीन पर्वतरांगांपैकी एक असलेल्या अरावलीला हानी पोहोचवू शकणारी कोणतीही व्याख्या स्वीकारण्याआधी, सरकार आणि सर्वोच्च न्यायालयाने सर्व पैलूंनी तपासणी करणे अत्यावश्यक आहे.

■ ■ ■

---

### मकरसंक्रांती विशेष

वाचक लिहितात

तिळगुळ घ्या आणि गोड बोला असा संदेश देणारा सण म्हणजे मकरसंक्रांती. ऋणानुबंध जपणारा, प्रेमभाव वृद्धिंगत करणारा, नात्यांमध्ये गोडवा वाढवणारा असा हा मकरसंक्रांतीचा सण.

मकरसंक्रांती दिवशी केवळ तिळगुळ घ्या आणि गोड अस म्हणण्यापेक्षा आपल्या बोलण्यात, वागण्यात देखील गोडवा असणे आवश्यक आहे. आपले बोलणे - वागणे यात गोडवा, प्रेम, नम्रता, कृतज्ञता असल्यास सर्वांनाच आपल्याबद्दल आपुलकी आणि आधार वाटेल. सर्वांशी आपली जवळीक होईल. हे सर्व फक्त गोड बोलण्यामुळे आणि वागण्यामुळे साध्य होतं. यासाठी मकरसंक्रांती या सणाचा मूळ उद्देश लक्षात घेणे महत्त्वाचा आहे.आपल्यामध्ये असलेले दोष आणि अहं, मनामधील पूर्वग्रह, भेदभाव करणे या सर्वांवर नियंत्रण ठेवले तर आपल्यामध्ये गुणांची वृद्धी होते. ईश्वराला अपेक्षित असणारे गुण सहजपणे आपल्यामध्ये येतात. आपली सात्विकता वाढून आपले व्यक्तीमत्व विकसित होईल. हे सर्व आत्मसात केल्यास मकरसंक्रांतीचा मुख्य उद्देश निश्चितच सफल होईल.

■ **सुरेश पंडीत, सातारा.**

---

# विद्यार्थ्यांच्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नातील मार्गदर्शक दुवा : डॉ. अवधूत निरगुडे





माणूसपणाची पाऊलवाट
सुजाता बंडावार
mahasagarngp@gmail.com

डॉक्टर या नावाभोवतीचं प्रतिष्ठेचं वलय काही वर्षांपूर्वी जितकं प्रभावी होतं, तितकंच ते आजही कायम आहे. पालकांना आपल्या पाल्याने डॉक्टर व्हावं असं वाटतं आणि विद्यार्थ्यांनाही डॉक्टर हे बिरूद भूषवण्याचं आकर्षण अजूनही तितकंच तीव्र आहे.

मात्र भारतातील वैद्यकीय शिक्षण व्यवस्थेचं वास्तव पाहिलं, तर शासकीय आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या जागा आणि पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या यामध्ये प्रचंड तफावत आहे. याच तफावतीमुळे एमबीबीएस प्रवेशासाठी तीव्र स्पर्धा निर्माण होते आणि अनेक गुणवंत विद्यार्थ्यांची डॉक्टर होण्याची स्वप्नं अपूर्ण राहतात.

याच वास्तवाला पर्याय देत, भारतात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी परदेशात वैद्यकीय शिक्षणाच्या माध्यमातून डॉक्टर होण्याचं स्वप्न साकार करण्याचा मार्ग दाखवणारे नांदेडचे प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. अवधूत निरगुडे आज हजारो विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक दुवा ठरत आहेत.

डॉ. अवधूत निरगुडे सांगतात की, स्वतःच्या मुलाच्या तसेच मित्र-नातेवाईकांच्या मुलांच्या एमबीबीएस प्रवेशाच्या काळात त्यांना अनेक अडचणींना सामोरं जावं लागलं. या प्रक्रियेतूनच परदेशी वैद्यकीय शिक्षणाबाबत सखोल माहिती मिळाली. भारतातील मर्यादित जागांच्या तुलनेत परदेशात उपलब्ध असलेल्या संधी अधिक व्यवहार्य, परवडणाऱ्या आणि दर्जेदार असल्याचं त्यांच्या लक्षात आलं.

भारतामध्ये दरवर्षी सुमारे सव्वा लाखाच्या आसपास वैद्यकीय शिक्षणाच्या जागा उपलब्ध असतात. यापैकी साठ ते सत्तर हजार जागा शासकीय असून उर्वरित खाजगी व निमशासकीय आहेत. मात्र दरवर्षी नीट परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दहा लाखांहून अधिक असते. खाजगी महाविद्यालयांची फी सर्वसामान्य कुटुंबांना परवडणारी नसल्याने अनेक विद्यार्थ्यांसाठी डॉक्टर होण्याचं स्वप्न दुरावते.

डॉ. निरगुडे स्पष्टपणे सांगतात की, ज्या विद्यार्थ्यांना भारतात एमबीबीएससाठी प्रवेश मिळत नाही, ते विद्यार्थी परदेशात वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर होण्याचं स्वप्न पूर्ण करू शकतात. रशिया, उझबेकिस्तान, आर्मेनिया यांसारख्या देशांमधील शासकीय वैद्यकीय विद्यापीठांमध्ये उच्च दर्जाचं शिक्षण दिलं जातं. मात्र परदेशी शिक्षण घेताना तेथील शिक्षण इंग्रजी माध्यमात आहे का, हे तपासणं अत्यंत आवश्यक आहे, कारण काही देशांमध्ये मातृभाषेत शिक्षण दिलं जातं.

आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठांमध्ये स्वतंत्र जागा राखीव असतात आणि इंग्रजीत अध्यापन करणारे प्राध्यापक असणं ही महत्त्वाची अट असते. सध्याच्या परिस्थितीत उझबेकिस्तान आणि रशिया हे देश वैद्यकीय शिक्षणासाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह असल्याचं ते नमूद करतात.

ही माहिती पालक आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी, योग्य मार्गदर्शन मिळावं आणि कोणत्याही फसवणुकीला बळी पडू नये, यासाठी डॉ. अवधूत निरगुडे एमडी हाऊस (चंदीगड) या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना परदेशात वैद्यकीय शिक्षणासाठी पाठवण्याचं कार्य करीत आहेत.

२०१७-१८ पासून सुरू असलेल्या या कार्यात आजपर्यंत अनेक विद्यार्थी यशस्वीपणे परदेशात शिक्षण घेत आहेत आणि विशेष म्हणजे आजपर्यंत एकही तक्रार आलेली नाही, हे ते अभिमानाने सांगतात.

विद्यार्थ्यांना १४ - १५ जणांच्या छोट्या बॅचेसमध्ये शिक्षण दिलं जातं. स्वयंअध्ययनावर भर, वैयक्तिक लक्ष, उत्तम होस्टेल्स, राहण्याच्या, खाण्या पिण्याच्या सुविधा, शिस्तबद्ध वातावरण यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघेही समाधानी आहेत.

२०१८ नंतर परदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी नीट परीक्षा पात्र असणं बंधनकारक आहे. नीट पात्र न होता परदेशात शिक्षण घेतल्यास भारतात वैद्यकीय व्यवसाय करता येत नाही. भारतात प्रॅक्टिस करण्यासाठी एफएमजीई (Foreign Medical Graduate Examination) उत्तीर्ण होणं आवश्यक आहे. तसेच कोणत्याही देशात वैद्यकीय व्यवसाय सुरू करण्यासाठी त्या त्या देशाच्या मेडिकल कौन्सिलच्या परीक्षा पास कराव्या लागतात, याबाबत ते स्पष्ट आणि प्रामाणिक मार्गदर्शन करतात.

कोविड काळात तसेच युक्रेन-रशिया युद्धाच्या वेळी एमडी हाऊसच्या माध्यमातून पाठवलेले सर्व विद्यार्थी सुखरूप होते. युद्धकाळात विद्यार्थी पालकांपर्यंत सुरक्षित पोहोचेपर्यंत डॉ. निरगुडे, त्यांची टीम आणि प्रतिनिधी सतत संपर्कात होते. सर्वोच्च न्यायालय, एमसीआयच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना उझबेकिस्तान, रशिया व इतर देशांमध्ये स्थलांतरित करण्याची व्यवस्था करण्यात आली.

मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याच्या कळमनुरी तालुक्यातील सांडस गावचे रहिवासी असलेले डॉ. अवधूत निरगुडे आजही आपल्या गावाशी आणि शेतीशी घट्ट जोडलेले आहेत. हजारो रुग्णांवर उपचार करत असताना सामाजिक संवेदनशीलता त्यांनी कधीही सोडलेली नाही.

त्यांचे वडील कै. प्रा. डॉ. राघोजी निरगुडे – मराठवाड्यातील पहिले अर्थशास्त्रातील पीएचडी – आणि आई गंगाबाई निरगुडे यांच्या संस्कारांतूनच त्यांची जडणघडण झाली. अडल्या-नडलेल्या लोकांना मदत करणे, गावातून उपचारासाठी आलेल्यांची राहण्याची व जेवणाची सोय करणे, ही माणुसकीची शिकवण त्यांनी लहानपणापासून अनुभवली.

जलसंधारण, पाणी अडवाझपाणी जिरवा, नैसर्गिक शेती यांमुळे प्रेरित होऊन त्यांनी आपल्या गावात मोठं काम उभं केलं. पोलीस विभाग, प्रशासन, शास्त्रज्ञ, सामाजिक संस्था, डॉक्टर, पत्रकार, शेतकरी आणि गावकऱ्यांच्या सहभागातून २३ किलोमीटर ओढा खोलीकरण व सरळीकरणाचं काम पूर्ण झालं. ही योजना मधे बंद पडली असली, तरी पुन्हा सुरू करण्याचा निर्धार ते व्यक्त करतात.

तीस वर्षांच्या अनुभवातून, पत्नी डॉ. उर्मिला निरगुडे यांच्या सहकार्याने लाखो रुग्णांवर उपचार करताना आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून जीवनशैली आहे, हा विचार त्यांनी समाजात रुजवला. वंधत्व, वात, मणक्यांचे, पोटाचे आजार आयुर्वेद आणि पंचकर्म उपचाराने बरे होऊ शकतात, असा त्यांचा ठाम विश्वास आहे.

मुलगी डॉ. अक्षता आणि मुलगा डॉ. ओमकार यांच्यासह संपूर्ण निरगुडे कुटुंब आयुर्वेद, शिक्षण आणि सामाजिक सेवांचा वारसा पुढे नेत आहे. वडिलांच्या विचारांच्या आणि आईच्या मायेच्या पायावर पाय ठेवून घडलेली ही डॉक्टरांची निर्मिती आज साता समुद्रापार पोहोचलेली आहे.

विद्यार्थ्यांना दिशा, रुग्णांना आरोग्य आणि समाजाला संवेदनशीलता देणारे डॉ. अवधूत निरगुडे आज हजारो विद्यार्थ्यांच्या डॉक्टर जेहोण्याच्या स्वप्नातील खरे मार्गदर्शक दुवा ठरले आहेत. त्यांच्या या बहुआयामी, सेवाभावी आणि प्रेरणादायी वाटचालीस शुभेच्छा.

डॉ.अवधूत निरगुडे संपर्क क्रमांक
8421503445

■ ■ ■

---

## सरसरसरररऽऽ उडली पतंग !



: रचनाकार :
**स्वरचैतन्य डॉ. मिलिंद इंदूरकर**
**(मनवा) नागपूर ९५५२६०७६४६**

सरसरसररर उडली पतंग ।
झरझरझररर हवा तरंग ।
आकाशी नवरंग पतंग ।
सखे सोबती हो हुडदंग ।१

ऊंच नभी ती टोकदार रे !
ढगा आड ती डब्बेदार रे !
आली सररर चांद-दार रे !
पेचा घे ना ! दादाऽ धाव रे ॥
सरसरसररर उडली पतंग
झरझरझररर हवा तरंग ... २ .

भरभर चालली मुच्छाकडा रे ।
चक्कर मारती टोकदार रे ॥
लपत छपत लंगोटदार रे ।
तरंगत आला तिरंगा बरे ॥
पेचा घेण्या ! दादा घाबरे
सरसरसररर उडली पतंग
झरझरझररर हवा तरंग ... ३

ढील दे बघू! सागर रे ऽ ऽ
चक्री धरना रे ! राघव रे ऽ ऽ
गुंता सोड तू ! माधव रे ऽ ऽ
पायात अडकतो मांजा रे ऽ ऽ
पेचा घेता ! दादा सावरे !

सरसरसररर उडली पतंग
झरझरझरर हवा तरंग ....४

ती लाल पतंग, हो हो म्हणते ।
ती पिवळी पतंग, नाही म्हणते ।
डोळेदार चक्करच मारते ।
गोलदार उलटीच धावते ।
पेचा लागला दादा न आवरे !
सरसरसरर उडली पतंग
झरझरझरर हवा तरंग ... ५

दोरी तुटली ,पतंग कटली ।
हवे-तरंगली, हवेत-रंगली ।

हवेची संगिनी, झाडा लटकली
डोळ्यात अश्रू तरळली ।
पेचात दादा ! कटली कशी रे ?
सरसरसरर उडली पतंग
झरझरझरर हवा तरंग .... ६ .

राग आला ! दादा उठला !
मांजा फेकला! खुर्चीत बसला
लाडू खाल्ला ! पटकन हसला
गच्चावर गेला ! ढह्वा घेतला
सुत्तर लावला ! मांजा बांधला
पतंग फेकला ! हवा-तरंगला
हवेत-रंगला ! दादा दंगला !

तीळगुळ खाल्ला ! गोड झाला
तीळगुळ घ्या..गोड गोड बोला
सरसरसरर उडली पतंग
झरझरझरर हवेत-रंग ... ७ .
ओ ऽ ऽ का ऽ ऽ ट !!!



---

# हे आरोग्यदायी पदार्थ चुकीच्या पद्धतीने खाल्ले तर..



रोजच्या धावपळीत आणि कामाच्या ताणतणावात आपण आपल्या आरोग्याकडे नीट लक्ष देत नाही. त्यामुळे आपण या व्यस्त जीवनशैलीत निरोगी राहण्यासाठी पोषक तत्वांनी समृद्ध आहाराचा आपण सेवन करत असतो. परंतु हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की सर्वकाही आरोग्यदायी पदार्थ प्रत्येकासाठी आरोग्यदायी ठरतील असे नाही. आजकाल लोकं सोशल मीडियावरील ट्रेंड फॉलो करताना पाहिला मिळतात, पण ही लोकांची सर्वात मोठी चूक आहे. अन्नपदार्थांच्या बाबतीत प्रत्येक ट्रेंडमध्ये असलेला पदार्थ तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल हे सांगता येत नाही. काही लोकं अनेकदा सोशल मीडियावर हे पदार्थ आरोग्यदायी आहे असे सुचवताना दिसतात. मात्र हे पदार्थ जर चुकीच्या पद्धतीने सेवन केले तर ते तुमच्या आरोग्याला फायद्याऐवजी नुकसान पोहोचवू शकतात.

सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट श्वेता शाह यांनी सांगितले आहे की जरी एखादा पदार्थ सोशल मिडियावर खूप लोकप्रिय असला तरी तो पोषण तज्ञ म्हणून काही विशिष्ट पदार्थ खाण्याची किंवा टाळण्याची शिफारस करत नाही. फक्त काहीतरी एखादा पदार्थ

दही, फळं आणि नट्स वापरून एक आरोग्यदायी स्मूदी बनवली जाते, ज्यामुळे ते एक उत्तम आरोग्यदायी पेय बनते. थंड स्मूदी ऊर्जा देण्याऐवजी अशक्तपणा आणि पचन आणि हार्मोन्सवर प्रतिकूल परिणाम करू शकते.

**मल्टीग्रेन पिठाची रोटी**

वाढत्या खाण्याच्या ट्रेंडनुसार तुम्हाला सोशल मीडियावर वेगवेगळ्या धान्यांच्या पीठापासून तयार केलेल्या रोट्या आरोग्यासाठी किती फायदे प्रदान करते असे सांगणारे अनेक व्हिडिओ पाहायला मिळतील परंतु ते सर्वांसाठी फायदेशीर असतीलच असे नाही.

**चुकीच्या पद्धतीने सॅलड**

वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल तर रात्री सॅलड खाणे आरोग्यासाठी नुकसानकारक ठरू शकते. रात्री कच्चे सॅलड खाल्ल्याने तुमचे आतडे खराब होऊ शकतात आणि तुमची झोप बिघडू शकते.

**तूप टाळणे** : आतड्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी तुम्हाला घरगूती तूपातील चांगल्या फॅटची आवश्यकता आहे, म्हणून ते पूर्णपणे वगळणे किंवा जास्त प्रमाणात खाणे टाळा. तुमच्या आहारात संतुलित पद्धतीने घरगूती तूप समाविष्ट करणे फायदेशीर आहे.

■ ■ ■

---

### अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## हळदी - कुंकू ..!

महिलांचा प्रिय कार्यक्रम
आहे हळदी - कुंकू
विधवा बायांनाही -
बोलवा आवर्जुन काकू ..!

जनम मरण हाय कां
बरं कुणाच्या हाता?
बाईला दोष देणं म्हंजी
अंधश्रध्देच्या बाता . !

सावित्रीच्या लेकींनी
व्हावं थोडं करारी
तिच्या गालावरही
फुलेल हास्याच्या लहरी ..!

# मुख्य अधीक्षक अभियंत्यांची कार्यकारी अभियंत्यांना नोटीस

## दैनिक ‘महासागर’च्या बातमीचा परिणाम




**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.13 )** – चांदूर बाजार महावितरण उपविभागीय कार्यालयात विद्युत चोरीच्या प्रकरणांमध्ये अत्यल्प दंड आकारण्यात आल्याचा गंभीर संशय व्यक्त होत आहे. चोरीची स्पष्ट प्रकरणे समोर येऊनही अपेक्षेप्रमाणे दंडाची रक्कम न लावता कमी दंड ठोठावण्यात आल्याने संपूर्ण व्यवहारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, बाह्यस्रोत (आऊटसोर्स) कर्मचारी हे सोशल एजंटप्रमाणे काम करत असल्याची माहिती पुढे येत असून, त्यामुळे प्रकरण अधिकच संशयास्पद ठरत आहे.

महावितरणमधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काही प्रकरणांत खाजगी व्यक्ती तसेच राजकीय पुढाऱ्यांचा हस्तक्षेप झाल्याची चर्चा आहे. स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांनी या बाबीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही केला जात आहे. सुरुवातीला वरिष्ठ पातळीवरूनही ठोस कारवाई होत नसल्याचे चित्र दिसत होते.

दरम्यान, दैनिक ‘महासागर’ने या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत वृत्तमालिका प्रसिद्ध केली. त्याची दखल घेत अमरावती येथील महावितरणचे मुख्य अधीक्षक अभियंता यांनी मोर्शी विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

मात्र, संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी या नोटीसवर खुलासा सादर केला आहे की नाही, याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही.

या पार्श्वभूमीवर, दंड कमी आकारण्यामागील कारणे, बाह्य-स्रोत कर्मचाऱ्यांची भूमिका आणि संभाव्य राजकीय हस्तक्षेप यांची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याची जोरदार मागणी होत आहे. अन्यथा, महावितरणच्या महसुली नुकसानीबरोबरच प्रामाणिक वीज ग्राहकांवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी प्रतिक्रिया जाणकारांकडून व्यक्त होत आहे.

# जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला रंगतदार सुरुवात

## तीन दिवसीय महोत्सवात तीन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** – शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अमरावती यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला गुरुवारी श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणात उत्साहात सुरुवात झाली. तीन दिवस चालणाऱ्या या क्रीडा महाकुंभात जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सुमारे तीन हजार विद्यार्थी सहभागी झाले आहेत. उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र म्हणाल्या, ‘क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी व्यासपीठ आहे. या माध्यमातून शिस्त, नेतृत्वगुण, सांघिक भावना आणि चिकाटी वाढीस लागते. विद्यार्थ्यांनी या संधीचा पुरेपूर लाभ घेत मिशन स्कॉलरशिप व निपुण महाराष्ट्र उपक्रमात उज्वल यश संपादन करावे.’ मुलांची गुणवत्ता राज्यस्तरावर वाढविण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक शिक्षणाधिकारी सतीश मुगल होते. प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस व बाळासाहेब रायबोले उपस्थित होते. व्यासपीठावर उपशिक्षणाधिकारी गंगाधर मोहने, रजनी शिरभाते, निखिल मानकर, इम्रान खान, क्रीडा संयोजक प्रवीण खांडेकर तसेच विविध पंचायत समितींचे गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

### एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमातून संस्कृतीचे दर्शन

तिवसा पंचायत समितीअंतर्गत जि.प. शाळा सुरवाडीच्या विद्यार्थ्यांनी ‘पेपट शो’द्वारे राजस्थानी संस्कृतीचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळविली.

### चिंचोना शाळेचे मल्लखांब प्रात्यक्षिक लक्षवेधी

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक शाळा चिंचोना येथील विद्यार्थ्यांनी मल्लखांबावरील थरारक कसरती सादर करत प्रेक्षकांचे लक्ष वेधले.

### मेळघातील दुर्गाचा गौरव

लांबउडीत जिल्हा व विभागस्तरावर यश मिळवून राज्यस्तरावर अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या धारणी तालुक्यातील उकुपाटी शाळेच्या दुर्गा छगन कास्देकर हिचा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# जबरदस्ती धर्मांतराचा दबाव; विवाहितेचा छळ

## ब्राह्मणवाडा थडी हद्दीतील धक्कादायक प्रकार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )** – शहरातील ब्राह्मणवाडा थडी पोलीस ठाणे हद्दीत पतीकडून पत्नीवर जबरदस्ती धर्मांतराचा दबाव टाकून मानसिक व शारीरिक छळ केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी 34 वर्षीय विवाहितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिच्या 50 वर्षीय पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार महिला व आरोपी यांच्यात पूर्वी प्रेमसंबंध होते. त्यानंतर दोघांनी कायदेशीर विवाह केला. सुरुवातीला संसार सुरळीत होता. मात्र काही काळानंतर पतीने पत्नीवर स्वत:च्या धर्माचे रीतिरिवाज पाळण्याचा व धर्मांतर करण्याचा दबाव टाकण्यास सुरुवात केल्याचा आरोप आहे. माझ्याच धर्मात राहा, अन्यथा परिणाम भोगावे लागतील, अशा धमक्या देत तो तिला मानसिक त्रास देत होता.

महिलेच्या म्हणण्यानुसार, या धमक्यांसोबतच पतीकडून शारीरिक छळही केला जात होता. सततच्या अपमानास्पद वागणुकीमुळे ती तीव्र तणावात होती. अखेर धैर्य एकवटून तिने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

# चांदुर रेल्वे नगर परिषद उपाध्यक्ष पदी भाजप चे बच्चू वानरे

## स्वीकृत सदस्य पदासाठी निलेश विश्वकर्मा व डॉ पनपालिया





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि. 13 )** – नगरपरिषद चांदूर रेल्वेच्या उपाध्यक्षपदासाठी आज ठरल्याप्रमाणे निवडणूक प्रक्रिया पार पडली. अत्यंत चुरशीच्या लढतीत भाजपचे उमेदवार बच्चू वानरे यांनी 11 विरुद्ध 10 अशा एका मताच्या फरकाने विजय मिळवत उपाध्यक्षपदावर बाजी मारली.

आज सकाळी 11 वाजता पिठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांनी बैठकीचे आयोजन केले होते, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे यांच्या मार्गदर्शनात निवडणूक पार पडली या निवडणुकीत आपलं चांदूर पॅनलकडून अरिहंत गेडाम यांनी जोरदार लढत दिली. मात्र शेवटच्या टप्प्यात एका मताने त्यांना पराभव स्वीकारावा लागला. मतदान प्रक्रियेदरम्यान नगरपरिषद सभागृहात राजकीय हालचालींना वेग आला होता.

दरम्यान, याच बैठकीत स्वीकृत सदस्यपदासाठी देखील निवड करण्यात आली. भाजपकडून डॉ. सुभाष पनपालिया तर आपलं चांदूर पॅनलकडून निलेश विश्वकर्मा यांची स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आली.

निवडणुकीनंतर भाजप कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा करत विजयाचा जल्लोष केला. शहराच्या विकासासाठी नगरपरिषदेत समन्वयाने काम करण्याचे संकेत विजयी उमेदवारांकडून देण्यात आले. दुसरीकडे, आपलं चांदूर पॅनलनेही लोकहितासाठी रचनात्मक भूमिका बजावण्याचा निर्धार व्यक्त केला.

या निवडणुकीमुळे नगरपरिषदेत राजकीय समीकरणे अधिक स्पष्ट झाली असून, आगामी काळात शहराच्या विकासकामांवर या नेतृत्वाचा प्रभाव दिसून येण्याची शक्यता आहे.

### आपल चांदूर आणि काँग्रेस एकत्र

शहराला बहुप्रतिक्षित आपल चांदूर आणि काँग्रेस या नगर परिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आले असून काँग्रेस ने आपल्या चार व एक अपक्ष असे पाच नगरसेवक सह आपल चांदूर पॅनल ला पाठिंबा दिला त्यातून आता आपल चांदुर पॅनल जवळ 10 नगरसेवक झाले असून आता होणाऱ्या सभापती निवडणुकीची उत्सुकता वाढली आहे.



# वन्यप्राण्यांच्या उच्छादामुळे तुरीचे पीक जमीनदोस्त

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर,( दि.13 )** – यंदाच्या हंगामात समाधानकारक पावसामुळे तुरीचे पीक जोमात आले होते. चांगल्या उत्पादनाच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने शेती केली होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या वन्यप्राण्यांच्या हालचालींमुळे तुरीच्या शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून अनेक ठिकाणी पीक अक्षरश: जमीनदोस्त झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक शेतकऱ्यांच्या माहितीनुसार रात्रीच्या वेळी रानडुक्कर, नीलगाय व हरिणे शेतात घुसून उभे पीक उद्ध्वस्त करीत आहेत. काही तासांत संपूर्ण हंगामाची मेहनत वाया जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. स्वत: पहारा दिला तरी परिस्थिती नियंत्रणात आणणे कठीण होत असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी वनविभागाकडून पहारेकरी, प्रकाशयोजना, इलेक्ट्रिक फेंसिंग, संरक्षण भिंत यांसारख्या उपाययोजनांची मागणी केली आहे. तसेच नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तत्काळ करून योग्य ती भरपाई द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप केल्यासच शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो.

> आमच्या शेतातील पिकांचे वन्यप्राणी हे दरवर्षी मोठ्या प्रमाणात नुकसान करतात.त्यामुळे संबंधित विभागाने पाहणी करून नुकसान भरपाई देत वन्य प्राण्याचा बंदोबस्त करावा जेणे करून पुढच्या त्रासाला आळा बसेल नुकसान पाहता आम्हाला आत्महत्या केल्या शिवाय पर्याय उरणार नाही.
>
> **अनिकेत शिरभाते,**
> **शेतकरी, मंगरूळ चव्हाळा,**
> **ता. नांदगाव खंडेश्वर**

# वरूड नगरपरिषदेत काँग्रेसचे दोन सदस्य भाजपात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 )** नुकत्याच पार पडलेल्या वरूड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीनंतर शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. निवडणूक निकालानंतर भाजपाचे 18, राष्ट्रवादी काँग्रेसचे 4, राष्ट्रीय काँग्रेसचे 2, प्रहारचे 1 आणि 1 अपक्ष असे संख्याबळ होते. त्यानंतर अपक्ष आणि प्रहारच्या नगरसेवकांनी भाजपाला बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्यामुळे भाजपाचे संख्याबळ 20 वर पोहोचले. या घडामोडीनंतर काँग्रेसच्या दोन नगरसेवकांनी आपला गट भाजपात विलीन केल्याची घोषणा केली. त्यामुळे भाजपाचे एकूण संख्याबळ थेट 22 वर गेले असून नगरपरिषदेतील सत्तासमीकरण पूर्णत: भाजपाच्या बाजूने झुकले आहे. या विलिनीकरणामुळे काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला असून नगरपरिषदेत भाजपाची पकड अधिक मजबूत झाली आहे. नगराध्यक्षपद भाजपाकडे असल्यामुळे आता भाजपाला तीन स्वीकृत सदस्यांची नावे सहजपणे मंजूर करून घेणे शक्य झाले आहे. यामुळे भाजपाचे संख्याबळ आणखी वाढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसला स्वीकृत सदस्य पाठवण्यापूर्वीच रोखण्यात भाजपाला यश आले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. या राजकीय घडामोडींमुळे वरूड नगरपरिषदेत भाजपाची सत्ता अधिक बळकट झाली असून आगामी निर्णयप्रक्रियेत भाजपाचा प्रभाव निर्णायक ठरणार आहे. शहराच्या विकासकामांवर आणि प्रशासकीय धोरणांवर याचा थेट परिणाम होणार असल्याने नागरिकांचे लक्ष आता नव्या सत्ताकारणाकडे लागले आहे.

# नायलॉन मांजावर बंदी; उल्लंघनास कडक दंडाची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 13 )** – नायलॉन मांजाच्या वापरामुळे दरवर्षी अनेक नागरिक, पशु व पक्षी गंभीर जखमी होण्याच्या तसेच मृत्यूच्या घटना घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने 12 जानेवारी 2026 रोजी दिलेल्या आदेशानुसार नायलॉन मांजाच्या वापरावर कठोर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने अमरावती शहर पोलिसांनी नागरिकांसाठी महत्त्वाची सार्वजनिक सूचना जारी केली आहे.

न्यायालयाच्या निर्देशानुसार नायलॉन मांजाने पतंग उडविताना आढळलेल्या व्यक्तीकडून प्रत्येक उल्लंघनासाठी 25 हजार रुपये दंड आकारण्यात येईल. संबंधित व्यक्ती अल्पवयीन असल्यास हा दंड त्यांच्या पालकांकडून वसूल केला जाईल. नायलॉन मांजाची विक्री किंवा विक्रीच्या उद्देशाने साठा करणाऱ्या विक्रेत्यांकडून प्रत्येक उल्लंघनासाठी 2 लाख 50 हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे. वसूल केलेली रक्कम सार्वजनिक कल्याण खात्यात जमा करण्यात येईल. दंड न भरल्यास 15 दिवसांत नोटीस देऊन नंतर जमीन महसूलाप्रमाणे वसुली केली जाईल.

नायलॉन मांजाच्या वापर, विक्री अथवा साठ्याबाबत माहिती असल्यास नागरिकांनी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. या सूचनेबाबत अज्ञान ग्राह्य धरले जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

> ही सूचना सार्वजनिक सुरक्षितता, जीवित संरक्षण आणि उच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोर पालन करण्याच्या उद्देशाने आहे,
>
> **राकेश ओला,**
> **पोलीस आयुक्त,**
> **अमरावती शहर**

# संक्रांतीच्या साहित्याने बाजारपेठ फुलली

## तिळगूळ, हलव्याचे दागिने, बोरन्हाण व हळदीकुंकवाच्या वाणाची मोठी खरेदी



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.13 )**– ‘तिळगूळ घ्या, गोड बोला’ या संदेशाने परस्परांतील स्नेह वृद्धिंगत करणाऱ्या मकर संक्रांतीसाठी पथ्रोट परिसरातील बाजारपेठ सज्ज झाली आहे. तिळ, गूळ, बाजरी, ऊस, गाजर, बोरं, हरभरा, वाटाणा शेंगा, काळेभोर तीळ, वाणाचे साहित्य, सजावटीच्या वस्तूंनी बाजारपेठ गजबजून गेली आहे. भोगी आणि संक्रांतीच्या निमित्ताने खरेदीसाठी महिलांची विशेष गर्दी दिसून येत आहे.

नवीन वर्षातील पहिला सण म्हणून मकर संक्रांतीला विशेष महत्त्व आहे. नवविवाहिता, सुवासिनी, लहान मुले आणि कुटुंबीयांसाठी हा सण उत्साहाचा असतो. तिळगूळ देऊन आपुलकी जपण्याची परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने पाळली जात आहे. त्यामुळे तिळगूळ, तिळाच्या वड्या, लाडू, तसेच संक्रांती पूजेचे साहित्य मोठ्या प्रमाणावर विक्रीस ठेवण्यात आले आहे.

### हळदीकुंकवाच्या वाणासाठी विविध पर्याय

हळदीकुंकवासाठी स्टीलची भांडी, कुंकवाचे करंडे, पर्स, सौंदर्यप्रसाधने, नकली दागिने, आरसे, प्लास्टिकचे डबे, छोट्या वाट्या, चमचे, बांगड्या, टिकल्यांची पाकिटे आदी वस्तूंना मोठी मागणी आहे.

### हलव्याच्या दागिन्यांना मोठी मागणी

संक्रांतीनंतर होणाऱ्या बोरन्हाणासाठी हलव्याच्या दागिन्यांना मोठी मागणी आहे. लहान मुलींसाठी बांगड्या, अंगठ्या, हार, बाजूबंद, कंबरपट्टा, तर लहान मुलांसाठी मोरपीस मुकुट, बासरी, हार असे आकर्षक संच उपलब्ध आहेत. नवविवाहित महिलांसाठी मंगळसूत्र, नथ, कानातले, मेखला, साडीपिन, कंबरपट्टा यांसारख्या दागिन्यांचे नवे डिझाइन बाजारात आले आहेत. या संचांची किंमत 300 ते 400 रुपयांपासून पुढे आहे.

### तिळाचे दर वाढल्याने पदार्थ महाग

घाऊक बाजारात तिळाचा दर 180 ते 200 रुपये प्रतिकिलोवरून वाढून 230 ते 250 रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे तिळाची वडी, तिळाचे लाडू व तिळगूळ शेंगदाण्याच्या वड्यांचे दर प्रतिकिलो 320 रुपयांपर्यंत गेले आहेत, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली.

### काळ्या कपड्यांची क्रेझ

संक्रांतीला काळे कपडे परिधान करण्याची परंपरा असल्याने बाजारात काळ्या रंगाच्या डिझायनर साड्या, इरकल, गढीवाल आणि काठापदराच्या साड्यांनी महिलांचे लक्ष वेधून घेतले आहे. संक्रांतीच्या साहित्याने बाजारपेठ फुलली असून, उत्साह, खरेदी आणि परंपरेचा संगम पथ्रोटच्या बाजारात अनुभवायला मिळत आहे.

# वृद्धापकाळाने गोदाबाई कुबडे यांचे निधन



**वरूड ( दि.13 )** – बेनोडा शहीद येथील गोदाबाई शंकरराव कुबडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने कुबडे कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मनमिळावू, कुटुंबवत्सल व संस्कारक्षम स्वभावाच्या गोदाबाई कुबडे यांनी आयुष्यभर कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे निभावली. त्यांच्या प्रेमळ वागणुकीमुळे नातेवाईक व शेजाऱ्यांत त्यांना मोठा मान होता. त्यांच्या पश्चात पती शंकरराव कुबडे, तीन मुलगे, एक मुलगी, सून, नातवंडे व मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या जाण्याने कुटुंबाने एक आधारवड गमावला असून गावात शोकमय वातावरण आहे.

# जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, श्री विपुल बाबुराव देशमुख रा. देवी पार्क, जावरकर लॉन, देशमुख लॉन जवळ, रहाटगाव रोड, अमरावती, ता. जि. अमरावती यांच्या मालकी व ताब्यातील नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण विभाग कचेरीचे कक्षेतील व जि.प. अमरावतीचे हद्दीतील ग्राम पंचायत असलेले (मौजे-रेवसा, प्रगणे-नांदगावपेठ, ता.जि. अमरावती येथील शेत सर्व्हे नं (280/2 मधील 0हे. 24आर जमिनीतील मा. सहाय्यक संचालक नगर रचना मूल्यनिर्धारण विभाग अमरावती यांचे पत्र क्र. अकृषक / मो.रेवसा /ता.व.जि.अम./स.नं.280/2/ संसनर-अम/2105, दि.19.08.2022 नुसार अंतिम मंजुरी मिळालेले व वि. तहसिलदार साहेब अमरावती यांनी त्यांचे फाईलावरील ज्याचा रे.के.नं.एन.ए.पी. 34/रेवसा/72/2022-23 नि.ता.20.09.2022 नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजुर झालेल्या जागेतील (संगणिकृत 7/12 प्रमाणे भुमापन (क्र.280/2/ब) प्लॉट (नं.12 (बारा), याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे असुन याचे एकूण क्षेत्रफळ (89.78 चौ.मि. (966.39 चौ. फुट) असुन या प्लॉटची चर्तुः सिमा:-

पुर्वेस : लेआऊट मधील रोड, पश्चिमेस : स. 326

उत्तरेस :प्लॉट नं. 11, दक्षिणेस : प्लॉट नं. 13

सदर वर्णनीत मालमता ज्याचे नोंदणीकृत खरेदीखत क्र. 5474/2023, दि.18/5/2023

वरील मालमत्तेचे मुळ खरेदीखत झेरॉक्स साठी नेले असतांना जावरकर लॉन, रहाटगाव रोड, अमरावती, ता. जि. अमरावती येथे दि. 05/12/2025 रोजी सकाळी 11.55 वाजताच्या दरम्यान हरवले आहेत. त्याबाबत मालमत्ता धारक श्री. विपुल बाबुराव देशमुख यांनी दि. 05/12/2025 रोजी पोलिस स्टेशन नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती येथे रितसर तक्रार दाखल केलेली आहे. तसेच दस्तऐवजांचा आजपर्यत शोध लागलेला नाही. सदर प्लॉटचे मालक यांनी युनियन बँक, शाखा शेगाव नाका, अमरावती यांच्याकडे गृहकर्ज मिळण्याकीरता मागणी अर्ज दाखल केलेला आहे. सबब वर उल्लेखीत मालमत्तेत कुणाचाही हक्क, गहाण, कर्ज, बोजा किंवा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास ती नोटीस मिळाल्यापासुन 7 दिवसात खालील पत्यावर संपर्क करावा.

अथवा आमची बँक कर्ज मागणी अर्ज मंजुर करुन कर्ज पुरवठा केल्यास त्यानंतर कुणाचाही उजर चालणार नाही. तरी सर्व लोकांना विनंती आहे की, वरील वर्णनीत मालमत्तेच्या खरेदीखताच्या अस्सल प्रती / दस्तऐवज कुण्याही व्यक्तीला आढळल्यास कृपया खाली नमुद मोबाईल क्रमांकावर संपर्क साधाव्यात अथवा खाली नमुद पत्यावर आणुन द्याव्यात.

कोर्ट शिक्का

**ॲड. रेणुका एस कडु,**
**मो. क्र. 7498445499**
**शिवार्पण कॉलनी, कठोरा नाका,**
**अमरावती, ता. जि. अमरावती.**

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार आणि सामाजिक क्रांतीचा इतिहास

१४ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रातील मराठवाडा विभागाच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक इतिहासात केवळ एक तारीख नसून तो स्वाभिमान, संघर्ष आणि समतेच्या मूल्यांचा विजय साजरा करणारा क्षण आहे. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील मराठवाडा विद्यापीठाला हे नाव देण्यात आलेला हा दिवस म्हणजे वंचित, शोषित आणि दुर्लक्षित समाजघटकांच्या दीर्घ लढ्याचे फलित आहे. हा नामविस्तार केवळ एका संस्थेला दिलेले नाव नसून तो भारतीय लोकशाहीतील सामाजिक न्यायाच्या मूल्यांना शैक्षणिक क्षेत्रात मिळालेली औपचारिक मान्यता आहे. मराठवाड्यासारख्या ऐतिहासिकदृष्ट्या मागासलेल्या प्रदेशात बाबासाहेबांचे नाव असलेले विद्यापीठ असणे म्हणजे येथील लाखो लोकांच्या आशा, आकांक्षा आणि आत्मसन्मानाला एक बौद्धिक अधिष्ठान मिळणे होय.

-------------

मराठवाडा हा प्रदेश दीर्घकाळ सामाजिक आणि शैक्षणिक उपेक्षेचा बळी ठरलेला आहे. निजामशाहीच्या काळात येथील समाजरचना कठोर जातीय आणि वर्गीय भेदांवर आधारित होती. शिक्षण ही काही विशिष्ट गटांची मक्तेदारी बनली होती, तर बहुसंख्य लोकांसाठी अज्ञान आणि दारिद्र्य हेच नशीब ठरले होते.

स्वातंत्र्यानंतरही या प्रदेशाला औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा आणि उच्च शिक्षणाच्या संधी मिळण्यात मोठा विलंब झाला. त्यामुळे मराठवाड्याच्या तरुण पिढ्यांना केवळ रोजगारासाठीच नव्हे तर आत्मसन्मानासाठीही संघर्ष करावा लागला. अशा परिस्थितीत १९५८ मध्ये स्थापन झालेले मराठवाडा विद्यापीठ हे या प्रदेशासाठी आशेचे केंद्र ठरले, परंतु त्याची सामाजिक दिशा आणि वैचारिक अधिष्ठान याबाबतचा प्रश्न कायम होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. त्यांच्या मते, शिक्षण हे माणसाला केवळ नोकरी मिळवून देत नाही तर त्याला स्वतःची ओळख, अधिकारांची जाणीव आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शक्ती देते. बाबासाहेबांचे संपूर्ण जीवन हे शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक गुलामगिरी तोडण्याच्या संघर्षाचे प्रतीक होते.

त्यामुळे मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने संबोधने म्हणजे या संस्थेच्या आत्म्याला समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची दिशा देणे होते. ही मागणी म्हणूनच केवळ प्रतीकात्मक नव्हती, तर ती खोलवर सामाजिक अर्थ असलेली होती.

नामांतरासाठी उभा राहिलेला लढा हा मराठवाड्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचे सामाजिक आंदोलन ठरला. या आंदोलनात विद्यार्थ्यांपासून सामान्य नागरिकांपर्यंत अनेक घटक सहभागी झाले. हा संघर्ष केवळ एका नावासाठी नव्हता, तर तो या प्रश्नासाठी होता की शैक्षणिक संस्था कोणत्या मूल्यांवर उभी राहणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव स्वीकारणे म्हणजे जातीय अहंकार, सांस्कृतिक वर्चस्व आणि ऐतिहासिक अन्यायाला वैचारिक आव्हान देणे होते. त्यामुळे या मागणीला तीव्र विरोधही झाला, परंतु तो विरोधच या मागणीची सामाजिक गरज अधोरेखित करणारा ठरला.

अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी हा ऐतिहासिक निर्णय जाहीर झाला आणि मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर होण्याऐवजी नामविस्तार होऊन विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळाले.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5
@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

हा दिवस मराठवाड्याच्या वंचित समाजासाठी केवळ आनंदाचा नव्हे, तर इतिहासाशी न्याय झाल्याचा दिवस होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव या विद्यापीठाला मिळणे म्हणजे भारतीय संविधानातील समतेच्या तत्त्वांची शैक्षणिक क्षेत्रात झालेली प्रत्यक्ष अंमलबजावणी होती. या नामविस्तारामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची ओळख बदलली आणि त्याचबरोबर त्याची सामाजिक भूमिका अधिक ठळक झाली.

हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ केवळ पदव्या देणारी संस्था न राहता सामाजिक जाणीव घडविणारे आणि विवेक जागविणारे केंद्र बनले.

नामविस्तारानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांमध्ये, संशोधनाच्या विषयांमध्ये आणि शैक्षणिक वातावरणात सामाजिक प्रश्नांना अधिक महत्त्व मिळू लागले. जातीय विषमता, ग्रामीण दारिद्र्य, महिला प्रश्न, आदिवासी समाजाचे प्रश्न, स्थलांतर, बेरोजगारी आणि विकासातील असमानता यांसारख्या विषयांवर येथे सखोल अभ्यास सुरू झाला.

मराठवाड्याच्या वास्तवाशी जोडलेले ज्ञान येथे निर्माण होऊ लागले आणि त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे केवळ स्थानिक नव्हे तर राज्य आणि देशपातळीवरील बौद्धिक चर्चांमध्येही महत्त्वाचे स्थान मिळवू लागले.

या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःचे आयुष्यच बदलले नाही तर आपल्या कुटुंबांचे आणि गावांचे भविष्यही बदलले.

शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी आणि ग्रामीण कुटुंबातील मुले-मुली उच्च शिक्षण घेऊन प्रशासकीय सेवा, शिक्षण क्षेत्र, संशोधन आणि सामाजिक कार्यात पुढे आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे विद्यापीठ असल्यामुळे त्यांना आत्मसन्मानाची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव तीव्रतेने होते. त्यामुळे ते केवळ यशस्वी व्यावसायिक नव्हे तर सामाजिकदृष्ट्या सजग नागरिकही बनतात.

मराठवाड्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा खोल परिणाम झाला आहे. विविध विभागांमार्फत आयोजित होणारे परिसंवाद, चर्चासत्रे, साहित्यिक उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांमुळे विवेकवादी आणि समतावादी विचारांचा प्रसार झाला. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि स्त्रीदास्य यांविरुद्ध बौद्धिक वातावरण निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित संशोधन आणि साहित्यनिर्मितीमुळे विद्यार्थ्यांना सामाजिक वास्तवाची अधिक सखोल जाणीव झाली. विद्यापीठ हे केवळ शिकवण्याचे नव्हे तर समाजाला प्रश्न विचारण्याचे केंद्र बनले.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात शिक्षणावर बाजारपेठेचा प्रभाव वाढत आहे. शिक्षण म्हणजे केवळ रोजगार मिळवण्याचे साधन अशी धारणा बळावत आहे. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने आपल्या सामाजिक बांधिलकीची आठवण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला लोकशाही मजबूत करणारे, विवेक जागवणारे आणि समाजाला अधिक समतावादी बनवणारे साधन मानले होते. त्यामुळे तंत्रज्ञान, नव्या अभ्यासक्रमांची रचना आणि संशोधनातील नवकल्पना यांसोबतच मानवी मूल्यांचे अधिष्ठानही तितकेच महत्त्वाचे असले पाहिजे.

मराठवाड्याच्या वास्तवाशी घट्ट नाते ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने भविष्यातील वाटचाल करणे गरजेचे आहे. दुष्काळ, पाणीटंचाई, शेतकरी आत्महत्या, ग्रामीण बेरोजगारी, महिला सक्षमीकरण आणि आदिवासी विकास यांसारख्या प्रश्नांवर येथे अधिक सखोल आणि उपयुक्त संशोधन झाले पाहिजे.

या संशोधनाचा उपयोग धोरणनिर्मिती आणि स्थानिक विकासासाठी झाला तरच विद्यापीठाचे ज्ञान समाजाच्या जीवनात प्रत्यक्ष उतरू शकेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाशी जोडले होते, त्यामुळे या विद्यापीठाची प्रत्येक शैक्षणिक कृती समाजाभिमुख असणे आवश्यक आहे.

१४ जानेवारी हा दिवस म्हणून आपल्याला केवळ भूतकाळातील एका निर्णयाची आठवण करून देत नाही तर तो आपल्याला आज आणि उद्याची जबाबदारीही सांगतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव धारण करणाऱ्या विद्यापीठाने जात, वर्ग, लिंग आणि धर्म यांच्या पलीकडे जाऊन सर्वांना समान संधी देणारी संस्था बनणे हीच या दिवसाची खरी प्रेरणा आहे. विद्यार्थ्यांना केवळ नोकरीयोग्य नव्हे तर सामाजिकदृष्ट्या जागरूक, लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणारे आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव असलेले नागरिक घडवणे हेच या विद्यापीठाचे खरे ध्येय असले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा मराठवाड्याच्या वंचित समाजाच्या आशेचा दीपस्तंभ आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून हजारो युवक-युवतींना ज्ञान, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव मिळाली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव या संस्थेला केवळ ओळख देत नाही तर ती एक मूल्यव्यवस्था देते. समता, न्याय, विवेक आणि मानवता या मूल्यांच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ जितके अधिक मजबूत होईल तितक्याच वेगाने मराठवाडा सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध होईल.

१४ जानेवारी हा दिवस साजरा करताना आपण केवळ स्मरणोत्सव न करता बाबासाहेबांच्या विचारांनुसार समाज परिवर्तनासाठी नव्याने संकल्प करूया, कारण खरा नामविस्तार हा केवळ कागदावर नसून समाजाच्या जीवनात घडत असतो.

# तिळगूळ, वाण आणि पतंग माणुसकीचा सण

भारतीय सणपरंपरेत काही सण हे केवळ धार्मिक विधीपुरते मर्यादित न राहता सामाजिक संवाद, नातेसंबंध आणि जीवनमूल्यांची आठवण करून देणारे असतात. मकरसंक्रांत हा असाच एक सण. ऋतूंच्या बदलाची, सूर्याच्या उत्तरायण प्रवासाची आणि माणसाच्या अंतर्मनात सकारात्मक ऊर्जेच्या प्रवेशाची ही सुरुवात असते.

महाराष्ट्रात हा सण प्रामुख्याने तिळसंक्रांत म्हणून ओळखला जातो. तिळगूळ घ्या, गोड गोड बोला या साध्या वाक्यातून जीवनाचं मोठं तत्त्वज्ञान सांगणारा हा सण आजही सामाजिक सलोखा जपण्याचा संदेश देतो. मकरसंक्रांत म्हणजे सूर्य मकर राशीत प्रवेश करतो, उत्तरायणाची सुरुवात होते. कृषीप्रधान भारतासाठी हा क्षण अत्यंत महत्त्वाचा.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

थंडीचा कडाका ओसरू लागतो, दिवस मोठे होतात आणि शेतीला नव्या आशेची पालवी फुटते. शेतकऱ्याच्या आयुष्यातील कष्टाचा काळ मागे पडत, नव्या हंगामाची चाहूल लागते. त्यामुळेच हा सण केवळ पंचांगापुरता नसून, मातीशी जोडलेला आहे.

तिळसंक्रांतीचा आत्मा म्हणजे तिळगूळ. तीळ आणि गूळ दोन्हीही आरोग्यदायी, शरीराला उष्णता देणारे. थंडीच्या दिवसात शरीराला बळ देणारे. पण या खाद्यपदार्थामागे केवळ पोषणमूल्य नाही, तर सामाजिक संदेश आहे. तीळ काळे असले तरी गूळ त्यांना गोडवा देतो.

माणसाच्या आयुष्यातील कटुता, मतभेद, गैरसमज हे तिळासारखे असतात; पण संवाद, प्रेम आणि आपुलकीचा गूळ त्यांना गोड बनवतो. तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला ही केवळ शुभेच्छा नाही, तर ताणतणाव विसरून एकमेकांशी प्रेमाने वागण्याची विनंती आहे.

आज सोशल मीडियाच्या काळात शब्द जखमा करतात, टीका वाढते; अशा वेळी तिळगुळाचा हा संदेश अधिकच समर्पक ठरतो. महाराष्ट्रात तिळसंक्रांतीला वाण देण्याची प्रथा विशेष महत्त्वाची आहे. गृहिणी एकत्र येतात, हळदी-कुंकू लावतात, वाण देतात. ही प्रथा केवळ धार्मिक नाही; ती स्त्री-सामाजिकतेची शक्ती दर्शवते.

वाणामध्ये तीळ, गूळ, साखर, फुलं, भांडी, कापड यांचा समावेश असतो. काळानुसार स्वरूप बदलले; पण भाव कायम राहिला. घराघरांतील नाती घट्ट करणारा हा सण आहे. नव्या सूनबाईंना समाजात सामावून घेणारा, वृद्ध महिलांना मान देणारा आणि मैत्रीचा धागा घट्ट करणारा हा सोहळा आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात स्त्रियांना एकत्र येण्यासाठी वेळ कमी मिळतो. अशा वेळी तिळसंक्रांत ही संवादाची, अनुभवांची देवाणघेवाण घडवणारी पर्वणी ठरते.

उत्तर भारतात मकरसंक्रांत म्हणजे पतंगोत्सव. गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेशात आकाश रंगीबेरंगी पतंगांनी भरून जातं. पतंग उडवणं म्हणजे केवळ खेळ नाही; ते स्वातंत्र्याचं, स्पर्धेचं आणि आनंदाचं प्रतीक आहे.

लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत सर्वजण छतावर, मैदानावर एकत्र येतात. काय पो छे! चा जल्लोष, ढोल-ताशांचा गजर, संगीत, हास्य समाज एक क्षण तरी एकत्र येतो. तुटलेल्या नात्यांना जोडणारा हा सण आहे. मात्र आज पतंगोत्सवाबाबत पर्यावरणीय जाणीवही तितकीच महत्त्वाची ठरते. चायनीज मांजा, पक्ष्यांचे जीव, अपघात यामुळे आनंदाला जबाबदारीची किनार लागते.

पर्यावरणपूरक पतंगोत्सव ही काळाची गरज आहे. तिळसंक्रांत हा सण जाती-धर्माच्या भिंती ओलांडतो. तिळगूळ देताना कुणाचा धर्म विचारला जात नाही, वाण देताना कुणाची जात पाहिली जात नाही. हा सण समानतेचा आहे. संतपरंपरेतही संक्रांतीचं महत्त्व दिसून येतं. संतांनी गोड बोलण्यावर, अहंकार टाकून देण्यावर भर दिला. आज समाजात द्वेष, ध्रुवीकरण वाढत असताना तिळसंक्रांत आपल्याला मानवतेचा धडा देतो.

आज तिळगूळ व्हॉट्सअॅपवरच्या शुभेच्छांपुरता मर्यादित होतोय, हळदी-कुंकू ऑनलाईन गिफ्ट्समध्ये बदलतंय, पतंग मोबाइल गेममध्ये अडकतोय. बदल अटळ आहे; पण भाव हरवता कामा नये. संक्रांत म्हणजे केवळ सण नाही, ती संवादाची संधी आहे.

शेजाऱ्याशी बोलण्याची, नात्यांतली कटुता मिटवण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधी. तिळसंक्रांत आपल्याला शिकवते, शब्द गोड ठेवा, मन स्वच्छ ठेवा आणि नाती घट्ट ठेवा. तिळगुळाचा गोडवा, वाणाची आपुलकी आणि पतंगांचा उन्मुक्त आनंद हे सगळं मिळून तिळसंक्रांत केवळ सण न राहता माणुसकीचा उत्सव बनतो.

आज समाज तणावग्रस्त आहे, संवाद तुटतोय, मतभेद वाढत आहेत. अशा काळात तिळसंक्रांत अधिक अर्थपूर्ण ठरते. कारण हा सण सांगतो की, भांडणं विसरा, अहंकार सोडा, गोड गोड बोला कदाचित साध्या तत्त्वज्ञानात आपल्या समाजाचं मोठं उत्तर दडलेलं आहे.

तिळगुळाचा गोडवा तुमच्या शब्दांतून, वाणाची उदारता तुमच्या कृतीतून आणि पतंगासारखी उंच भरारी तुमच्या स्वप्नांतून सदैव झळकत राहो. नव्या उत्तरायणात आयुष्य अधिक प्रकाशमान, नातेसंबंध अधिक मधुर आणि भविष्य अधिक आशादायी व्हावे, हीच मनापासून तिळसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा!

# राष्ट्रीय भूगोल दिन

आज १४ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो हे खूपच कमी लोकांना माहित आहे. भूगोल हा विषय आपण लहान वयापासूनच शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही.

डॉ. सी डी देशमुख हे भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलातील ज्ञान अफलातून होते म्हणूनच त्यांना भूगोल महर्षी असे म्हटले जाते. भूगोल महर्षी सी डी देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे.

त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो.

भूगोल दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम साजरे केले जातात. भूगोल या शब्दाचा सरळ अर्थ पृथ्वीचा गोल असा होतो. भूगोल हा शब्द इंग्रजीतील Geography या शब्दासाठी पर्याय वापरला जातो. लॅटिन वरून आलेल्या या शब्दाचा अर्थ भुवर्णन शास्त्र.

पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व



आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे भूगोल असे स्थूलमानाने मानले जाते. भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र अशी देखील भूगोलाची व्याख्या केली जाते.

भूगोलाची तीन गटात विभागणी केली आहे.

१ ) प्राकृतिक भूगोल
२ ) मानवी भूगोल
३ ) प्रादेशिक भूगोल

प्राकृतिक भूगोलात भूरूप शास्त्र, हवामान शास्त्र, जैविक शास्त्र यांचा समावेश होतो. यासोबत किनारी प्रदेश, खनिज शास्त्र आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही समावेश होतो.

मानवी भूगोलात ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो.

प्रादेशिक भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्त्रोतांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

भूगोलाच्या सखोल आणि सविस्तर अभ्यासात विविध पद्धतीचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र, निरीक्षण, नकाशे यांना भूगोलात महत्वाचे स्थान आहेच पण आजकाल दुरसंवेदी कृत्रिम उपग्रह, द्रोण कॅमेरे, हवाई चित्रीकरण यांनी भूगोलाच्या निरीक्षण क्षमतेत भर घातली आहे.

मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण जगतो ते जग, त्याचे स्वरूप विविध प्रदेश, देश, तेथील लोकजीवन यांचे ज्ञान आपल्याला भूगोलामुळेच होते.

# : खांद्यावरचे स्टार्स : वैचारिकतेला प्रामाणिक कार्य कर्तृत्वाने चार चांद लावणारे पुस्तक

पुस्तकाचे नाव खांद्यावरचे स्टार्स असे वाचले आणि आकर्षक मुखपृष्ठ पाहिले की, आपल्या संवेदनशील मनाला लगेच जाणीव होते ती खाकी वर्दीची आणि सद्रक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीदवाक्याची!

मुखपृष्ठावरील खाकी वर्दी आणि पांढरा शुभ्र पक्षी... खरंतर समजणाऱ्याला बरेच काही सांगून जाते. मलपृष्ठावर लोकबिरादरी प्रकल्पाचे प्रकाशवड, ज्यांनी अनेकांच्या जीवनात प्रकाश आणला असे डॉ. प्रकाश बाबा आमटे व दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष यजुवेंद्र महाजन यांनी पुस्तकाचा मतितार्थ अत्यंत मोजक्या शब्दात व्यक्त केला आहे.

अंधारमय जीवन प्रकाशित करण्यासाठी खांद्यावरचे स्टार्स त्यांचे कार्य आणि कार्याप्रती असलेली समर्पण वृत्ती आपल्याला सुरुवातीलाच समर्पण मध्ये दिसून येते. सावधानपासून शिस्त अंगी बाणवणाऱ्या व साहसी वृत्तीने बदल घडवत क्षणोक्षणी जीवन समृद्ध करून टाकणाऱ्या ईश्वरी ऊर्जा स्त्रोतास हे पुस्तक समर्पित केले आहे.

पुस्तकाला ज्ञानेश्वर मुळे, अध्यक्ष, अभिजात भाषा पुरवठा समिती तथा राष्ट्रीय मानवाधिकार आयोग सदस्य, माजी केंद्रीय परराष्ट्र सचिव यांची प्रस्तावना लाभलेली आहे, जी अत्यंत बोलकी आहे. पुस्तकामध्ये एकूण २१ प्रकरणांची कायार्नुभवावर आधारित विभागणी केली आहे. त्यातील पहिली २० प्रकरणे ही कर्तव्य बजावताना आलेल्या अनुभवांची आहेत तर शेवटचे २१ वे प्रकरण हे लेखकाच्या स्वतःच्या संदर्भातील आहे.

एरवी आपण पोलिसांना कितीही नावे ठेवत असलो, शिव्या- श्राप देत असलो तरीही आपल्यावर अन्याय झाला की आपल्याला पहिली आठवण होते ती पोलिसांची! अति आनंद, दुःखद प्रसंग, अपघात, अन्याय, फसवणूक या व इतर अनेक बाबींसाठी शेवटी येऊन थांबतो ते आपण पोलिसांजवळ!

पोलिसांना खूप सारे अनुभव येत असतात आणि ते त्या अनुभवातून समृद्ध होत जातात. अशाच समृद्ध अनुभवातून लेखकाने खांद्यावरचे स्टार्स या पुस्तकात आलेले अनुभव आपल्यापुढे मांडले आहेत. सोशल मीडियाचा सकारात्मक वापर हा या पुस्तक लिहिण्याचा पाया म्हटले तर वावगे ठरणार नाही. समाज माध्यमातून मिळालेल्या सकारात्मक प्रतिक्रिया नेच त्यांच्या लेखनाला सुरुवात झाली आणि आपल्यापुढे समृद्ध अनुभव देणारे खांद्यावरचे स्टार्स हे पुस्तक निर्माण झाले.

कोणतीही सेवा असो, ती करत असताना विविध प्रकारचे अनुभव येत असतात. ते कधी सुखद तर कधी दुःखद असतात आणि त्यामुळेच सेवा करणारा त्यातून समृद्ध होत असतो. काम करताना आलेले अनुभव सर्वांनाच शब्दात मांडता येतील असे नाही, परंतु लेखकाने त्यांना आलेले अनुभव प्रामाणिकपणे अत्यंत कुशलतेने, ओघवत्या, सहज व सोप्या भाषेत पुस्तकात मांडले आहेत.

लेखक इथे प्रामाणिकपणे कबूल करतात की, मी प्रतिनिधी आहे समर्थ पोलीसजनांचा आणि ज्यांच्या खांद्यावर "स्टार्स" लागलेले आहेत त्यांचा. मी प्रतिनिधी आहे पोलिसांव्यतिरिक्त प्रशासनातील इतर विभागाचा, ज्यांच्याकडे मूर्त स्वरूपात "स्टार्स" नसले तरी आपल्या प्रशासकीय कर्तव्याच्या सहाय्याने हजारो- लाखो जणांचे स्टार्स चमकवण्याचे म्हणजेच भाग्य चमकवण्याचे सामर्थ्य - अधिकार आहेत. म्हणूनच 'आमचे खांदे स्टार्स लावण्यासाठीच ' आहेत.


नक्षलग्रस्त गोंदिया येथे उपविभागीय पोलीस अधिकारी अर्थात डीवायएसपी म्हणून खाकी वर्दीच्या प्रवासाला सुरुवात होते. आत्मसमर्पण या पहिल्याच प्रकरणात नक्षलवादामध्ये भरकटत जाणाऱ्या युवकाबद्दल लेखक म्हणतात की, जगाने उपेक्षा केलेल्या विचारांची कास धरून, क्रांतीची आस बाळगून बसलेले हे आपलेच परंतु वाट चुकलेले युवक! आणि या युवकांचा प्रतिनिधित्व करणारा युवक म्हणजे दिलेर जो पोलिसांनी केलेल्या प्रयत्नातून पोलिसांसमोर आत्म समर्पण करतो आणि नक्षलवादाच्या वाहवत चाललेल्या प्रवाहापासून वाचतो झोप पुढे विशेष पोलीस अधिकारी म्हणून देखील कार्य करतो.

मालेगाव मधील भवानी दादा... गुंडगिरीचा मार्ग सोडून समाजमान्य मार्ग अवलंबतो तो फक्त पोलिसाला असलेल्या त्याच्या अवांतर ज्ञानामुळे! पुलिस की दुवॉ नाव दिलेली हातगाडी त्याच्या जीवनाचा चेहरामोहरा बदलून टाकते. मुलीच्या वाढदिवसानिमित्त अजान आणि आरतीचा केलेला अनोखा मिलाप..!

धर्माविषयी बोलताना लेखक म्हणतात की, धर्म म्हणजे तरी काय? तर धारणा! सामाजिक आणि भौगोलिक परिस्थितीनुसार त्या त्या कालखंडात तयार झालेल्या चांगुलपणाच्या धारणा म्हणजे धर्म. खरे तर सर्वधर्म सारखेच.

कुरान शरीफ मधील रुह, गीतेमधील आत्मा, बायबल मधील सोल एकच! जन्नत, स्वर्ग, हेवन; जहन्नुम, नरक, हेल यांना वेगळे कसे म्हणायचे? परी, फरिश्ता, एंजल; परमधाम, आलम- ए- आरवा, स्विट होम किंवा प्रलय- कयामत - डिस्ट्रक्शन, दानव, शैतान, डेव्हिल ह्या काही वेगळ्या गोष्टी नाहीतच. ईश्वर, अल्लाह, गॉड ही एकाच परमेश्वराची नावे!

धर्माचा तुलनात्मक अभ्यास केला की हे कळून चुकते. रिकी पॉटिंग, इंजमाम उल हक किंवा सचिन तेंडुलकर शतक झाले की बॅट उंचावून वरती आकाशाकडे बघून कृतज्ञ व्हायचे. दिशा एकच! इतक्या सुंदर सहज शब्दात धर्माविषयी त्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.





| | |
|---|---|
| पुस्तकाचे नाव | :- खांद्यावरचे स्टार्स |
| लेखक | :- गजानन शिवलिंग राजमाने |
| प्रकाशन | :- पॉप्युलर प्रकाशन, मुंबई |
| स्वागत मूल्य | :- ३००/- |
| पृष्ठे | :- १२२ |

मॉलीवूड, नानांना सॅल्यूट, वेश्या व्यवसायात अडकलेली आई आणि बारावीला ८२ टक्के मार्क घेऊन आयपीएस बनवण्याचे स्वप्न बघणारे निकिता, तिचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढाकार येणारे मुजफ्फर नावाचे गृहस्थ, कोरोना काळात स्वातंत्र्यदिनी रक्तदान शिबिरामध्ये रक्त घ्या म्हणणारा अंडरवेट असणारा हट्टी तरुण, असे एक ना अनेक पात्रे आपल्याला मालेगाव सारख्या संवेदनशील शहरात लेखक भेटीला आणतात व त्यातून एक सामाजिक संदेश देऊ पाहतात जो आजच्या काळामध्ये खूपच आवश्यक झाला आहे.

महेश लांडगे
पोलीस निरीक्षक, परभणी.
9822417500

भारतीय संस्कृतीत दान करण्याला खूप महत्त्व आहे. जसे रक्तदान, जीवदान, अन्नदान, धनदान, कन्यादान, नेत्रदान, ज्ञानदान इत्यादी परंतु धर्मराजाने यशाला दिलेले जगातील सर्वश्रेष्ठ दानाचे उत्तर म्हणजेच अभयदान!

ईश्वराने, नियतीने, संविधानाच्या रूपात पोलिसांच्या खांद्यावर दिलेली मोठी जबाबदारी, अभयदान देण्याची! रात्री अपरात्री एकटे असताना मनाने भीतीचा ठाव घेत असतानाच पोलीस दिसावा आणि मग भीती गळून जाऊन सुरक्षितेची भावना निर्माण होईल हेच असते अभयदान! यावेळी सामान्य माणसाला पोलीस असल्याने सुरक्षित वाटते आणि तेच दुष्कृत्य करणा?याला भीती!

पोलिसांच्या जीवनात वारंवार येणारी आणि अटळ असणारी गोष्ट म्हणजे जेवणाची वेळ. जीवन आणि जेवण हे दोन्ही शब्द एकमेकांशी पूरक असे आहेत. म्हणूनच लेखक म्हणतात की, आमच्या जेवणापेक्षा कोणाचे तरी जीवन महत्त्वाचे असते.

पैशासाठी किडनॅप करणाऱ्या गुन्हेगाराला शिताफीने ताब्यात घेण्यासाठी राबवलेले ऑपरेशन हृदयाचा ठोका चुकवते. गोंदिया तसेच गडचिरोली जिल्ह्यातील अतिसंवेदनशील नक्षलग्रस्त गावासाठी आवाक्याच्या बाहेर जाऊन जनतेसाठी केलेली कामे पाहिली की, आपोआपच वाचकाचा उर भरून येतो. आपणही असेच सत्कार्य करायला हवे अशी भावना मनी निर्माण होते आणि मला वाटते हेच लेखकाचे यश आहे. आणि हे यश त्यांनी प्रत्यक्ष केलेल्या कार्यातून मिळवलेले आहे. आधी केले मग सांगितले ही उक्ती येथे खरी ठरते.

दारू हे समाजाला लागलेले एक ग्रहण जे अद्याप पर्यंत संपलेले नाही. पोलीस खात्यात काम करत असताना प्रत्येक जण आपापल्या परीने हे ग्रहण संपवण्याचा प्रयत्न करतो पण तू ते काही केल्या संपत नाही. अधिकारी आहे तोपर्यंत त्याच्यावर वचक निर्माण होते आणि थोडे दुर्लक्ष झाले की परत त्याचे साम्राज्य पसरते जसा सूर्य मावळला की काळोख त्याचे साम्राज्य निर्माण करत असतो.

सतत दारू पिणारा मरकाम मेजर ते दारू पिऊन येणाऱ्या घरात प्रवेश नाही असा नखशिकांत बदललेला मरकाम मेजर! स्व- परिवर्तनातून विश्व परिवर्तनाची कास धरणारी अशी अनेक पात्रे या पुस्तकात आपल्याला वेळोवेळी भेटतात आणि नकळत प्रेरणा देऊन जातात.

खरंतर माझ्या मते विद्यार्थ्यांना त्यांच्या दिशेत दशेत नावडणारी गोष्ट म्हणजे अभ्यास. परंतु त्याला इतर काहीही पर्याय नसल्याने अभ्यास हा करावाच लागतो. तोच अभ्यास पुढे जीवनाला आकार देत असतो. भरनोली सारख्या अतिदुर्गम नक्षलग्रस्त अतिसंवेदनशील गावात लेखक त्यांच्या पोस्टिंग दरम्यान पडक्या इमारतीला सुसज्य करून अभ्यासिका उभी करतात आणि त्या अभ्यासिकेत अभ्यास करून पहिला आदिवासी मुलगा संदीप ताराम फौजदार म्हणून सिलेक्ट होऊन दीपस्तंभ निर्माण करतो.

या गोष्टी करण्यासाठी खूप दुर्दम्य इच्छाशक्ती लागते, ती लेखकाजवळ काम करताना आपल्याला पदोपदी जाणवते. पिपरखारी हे गोंदिया जिल्ह्याच्या नकाशावर आणि गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवर असणारे नक्षलग्रस्त गाव जेथे लेखक पोस्टिंग दरम्यान स्वतः व इतर प्रशासकीय विभागांच्या मदतीने गावाचा चेहरा मोहरा बदलून टाकतो व तेथील नागरिकांना जीवनाचा सुकर मार्ग दाखवतो.

मोक्का आणि साधलेली संधी म्हणजेच मोका यांचा सांधलेला अनोखा संगम आणि केलेली कारवाई ज्यामुळे अट्टल गुन्हेगार गजाआड झाला व सर्वसामान्य नागरिकांचा जीव भांड्यात पडला. साताऱ्यातील निसर्गरम्य ठिकाणे त्याचे वर्णन आणि त्याला साजेशी केलेली डॉल्बी बंदी! डॉन को पकडना मुश्किल ही नही नामुमकीन है असे वाटणारा डॉन अखेरीस चड्डीवर अनवाणी फिरताना दिसतो तो फक्त पराकोटीच्या कर्तव्य सजगतेमुळे!

इंडिया पासून कोसो दूर असलेल्या अति दुर्गम भागातील नागरिकांना घर मिळवून देणे, बंदुकी ऐवजी पुस्तक हातात देणे, व्यसनमुक्तता करणे, खतरनाक गुन्हेगारांना त्यांची जागा दाखवणे, जीवन जगण्याची हिम्मत देणे आणि सर्वात महत्त्वाचे जनतेला सुरक्षेचे अभयदान देणे हेच आहेत खांद्यावरचे स्टार्स... जे मुखपृष्ठावरील खाकी वर्दी आणि पांढरा शुभ्र पक्षी म्हणजेच निष्कलंक खाकी वर्दीवरती त्यांच्या वैचारिक व प्रामाणिक कार्यकर्तृत्वाने लावतात चार चाँद!

# नागपूरचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३:
नागपूरच्या सर्वांगीण विकासाचा विचार डोळ्यापुढे ठेवला. जात-पात-धमार्चा विचार केला नाही. सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे कल्याण डोळ्यापुढे ठेवले. राजकीय भावनेतून कामे केली नाहीत आणि भेदभावही केला नाही. कारण नागपूरच्या जनतेला आम्ही आपला परिवार मानले आहे, असे प्रतिपादन केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी आज, मंगळवार १३ जानेवारी रोजी केले. बांगलादेश येथील नाईक तलाव परिसरात प्रचार सभेत ते बोलत होते.



प्रभाग २०, प्रभाग ८ आणि प्रभाग २२ मधील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ गडकरी यांची बांगलादेश येथील नाईक तलाव चौकात जाहीर सभा झाली. यावेळी आमदार प्रविण दटके, माजी आमदार गिरीश व्यास, माजी आमदार विकास कुंभारे यांची प्रमुख उपस्थिती होती. नागपूरच्या विकासाची पहिली फिल्म हीट झाली आहे, आता दुसरी फिल्म लवकरच बघायला मिळेल, असे सांगत नवे प्रकल्प नागपुरात सुरू होणार असल्याचे गडकरी म्हणाले.

या भागातील प्रश्न सातत्याने सोडविण्याचे प्रयत्न आम्ही केले. नाईक तलावाच्या सौंदर्यीकरणाचे भूमिपूजन झाले. रेल्वे फाटकाचा प्रश्न सुटला. रस्त्याची सोय झाली. मुंबई-कोलकाता रेल्वेलाईनवर अंडरपासची गरज होती, हा प्रश्न देखील सुटला. हलबा समाजाचे प्रश्न सोडविण्याचा आम्ही प्रयत्न केला, जनतेच्या समस्या सोडविणे हा उद्देश होता, असे ते म्हणाले.

कमाल टॉकीज चौकातून सुरू होणाऱ्या उड्डाणपुलाचे उद्घाटन ३० मार्चपूर्वी होणार आहे. या पुलावरून बारा मिनीटांच्या आत ताजबागच्या पलीकडे पोहोचता येईले. वाहतुकीची मोठी समस्या सुटणार आहे. वर्धा रोड, कामठी रोड आणि पारडी अश्या तीन ठिकाणी उड्डाणपुलांचे विश्वविक्रम झाले. खाली रस्ता, त्यावर पूल आणि त्यावर मेट्रोचा पूल असे बांधकाम झाले आहे. प्रत्येक ठिकाणी नवीन तंत्रज्ञान वापरले आहे, असेही गडकरी म्हणाले.

शहराच्या बांगलादेशमध्ये लोकांना हक्काचे घर मिळाले. गोरगरीब जनतेला निवारा मिळाला. आतापर्यंत ७०० घरांच्या रजिस्ट्री झाल्या आहेत, असेही ते म्हणाले.

नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथे प्रकल्प सुरू केला आहे. लवकरच त्याठिकाणी दहा हजार चौरस फुट जागेत मोठ्या इमारत उभी होईल. हातमागावरील साड्या विणण्याचे काम होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

# रोकड, ड्रग्ज आणि शस्त्रे जप्त निवडणूक काळात मोठी कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :
महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या काळात प्रशासनाने आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करत लाखो रुपयांची रोकड, बेकायदेशीर ड्रग्ज आणि बंदुका जप्त केल्या आहेत.

शहरातील विविध प्रभागांमध्ये पोलिसांनी आणि भरारी पथकांनी मोठ्या प्रमाणावर छापे टाकले असून, १३ लाखांहून अधिक रोकड, हजारो लिटर दारू तसेच अनेक प्रकारची अवैध शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

प्रभाग १० आणि १९ मध्ये ही कारवाई विशेषतः प्रभावी ठरली असून, प्रशासनाने एमपीएडी आणि मकोका अंतर्गत ८०० हून अधिक प्रकरणे नोंदवली आहेत.

याशिवाय, अनेक राजकीय पक्षांच्या बॅनर आणि स्टिकर्सवर देखील त्वरित कारवाई झाली आहे. रामनगर आणि दाभा भागातील आमदार परिणय फुके व माजी आमदार सुधाकर कोहळे यांचे बेकायदेशीर बॅनर काढून टाकण्यात आले असून, प्रभाग १ मधील उमेदवार शैलेश पांडे आणि कंठीराम शेंडे यांच्या बॅनरही हटवण्यात आले आहेत.

शिवसेना (उद्धव गट) आणि आम आदमी पक्षाच्या बेकायदेशीर जाहिरातींवर देखील प्रशासनाने सक्तीने कारवाई केली आहे. प्रशासनाचे हे कठोर पाऊल शांत आणि निष्पक्ष निवडणुकीसाठी महत्वाचे असल्याचे म्हटले जाते.

दरम्यान, बुधवारपासून पोलीस प्रशासनाची नजर अधिकच तीक्ष्ण राहणार असून, मतदानाच्या आदल्या रात्री पैशांचे वाटप होत असल्याच्या पार्श्वभूमिवर निवडणूक विभाग आणि पोलीस प्रशासन अधिक सजग राहणार आहे. मतदारांना दारू आणि अन्य वस्तुंचे वाटप केले जाते. याकडेही पोलीस विभाग कटाक्षाने लक्ष पुरवणार आहे.

# सेलुत बँक लुटली!

## २३ लाखावर मारला डल्ला

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. १३:
सेलू तालुक्यातील सुकळी बाई येथे बँक ऑफ इंडियाची शाखा आहे. आज सकाळी बँक उघडण्यास गेलेल्या कर्मचाऱ्यास बँकेची खिडकी फोडल्याचे दिसून आले.

त्याने बँकेचे शाखा व्यवस्थापक गावंडे यांना या घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलीस पण घटनास्थळी पोहचले. किती रक्कम लंपास झाली याचा प्राथमिक तपास झाला.

बँकेतील २३ लाख रुपयांची रोख चोरल्या गेल्याचे निष्पन्न झाले आहे. ही घटना उजेडात आली आणि पंचक्रोशीतील बँक खातेदार गोळा झाले. लुटारू चांगलेच हिकमती असल्याचे दिसून आले आहे.

नेमके किती लुटारू होते, हे स्पष्ट झाले नाही. मात्र त्यांची तयारी कसून होती. त्यांनी बँक इमारतीच्या वर लावलेल्या सिसिटीव्ही यंत्रनेस स्प्रे शिंपडून तो निकामी केला. तसेच बाह्य जगाशी कनेक्ट करणा?या सर्व तारा तोडून टाकल्या. या बँक इमारतीची मोठी खिडकी फोडून त्यांनी आंत प्रवेश केला. आणि रक्कम लंपास केल्याचे प्राथमिक तपासातून निष्पन्न झाले आहे.

विशेष म्हणजे, याच बँक शाखेत दीड वर्षापूर्वी असाच चोरीचा प्रयत्न झाला होता. मात्र तो अयशस्वी ठरला होता. त्यावेळी जे बँक मॅनेजर होते, तेच आताही कार्यरत आहे. पहिला प्रयत्न फसला म्हणून बँकेत अलार्म सह सर्व तो कडेकोट बंदोबस्त वाढविण्यात आला. पण त्यावर टिच्चून चोरट्यानी डाव साधला आहे.

पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल हे या संदर्भात बोलतांना म्हणाले, की लवकरच छडा लागेल. तीन चमू तपासकामी तैनात करण्यात आल्या आहेत. श्वान पथक येऊन गेले आहे. स्थानिक गुन्हा शाखा व सायबर पोलीस पण दिमतीस आहे. २३ लाख रुपये चोरीस गेल्याचे बँकेने सांगितले आहे. तांत्रिक व अन्य स्त्रोत तपासात आहे, असे पोलीस अधीक्षकांनी सांगितले. चोरट्यांचा शोध सुरू आहे.

# सत्ता आल्यास नवीन दारू दुकानांना परवानगी नाही

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १३:
महापालिकेत भाजपची सत्ता आली तर यापुढे देशीविदेशी दारू दुकान तसेच बियर बार व बियर शॉपीला कोणत्याही परिस्थितीत परवानगी देणार नाही, अशी घोषणा माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी जाहीर सभेत केली.

महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत आमदार मुनगंटीवार यांनी प्रचार सभांचा धडाका सुरू केला आहे. जाहिर सभेत बोलतांना जगन्नाथबाबा नगर येथे बियर शॉपीसाठी परवानगी द्यावी यासाठी महापालिकेत अर्ज आल्याचे त्यांनी सांगितले. मात्र आता झाले ते बस, महापालिकेत भाजपची सत्ता आली तर एकाही नवीन देशीविदेशी दारू दुकान, बियार बार व बियर शॉपीला परवानगी दिली जाणार नाही, अशी घोषणाच मुनगंटीवार यांनी केली.



विशेष म्हणजे, मुनगंटीवार यांनी २०१४ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यात संपूर्ण दारूबंदी जाहिर केली होती. तेव्हाही मुनगंटीवार यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात दारूबंदी करण्याचे आश्वासन मतदारांना दिले आणि त्या आश्वासनाची पूर्तता लगेच केली होती.

चंद्रपूरात सलग पाच वर्ष दारूबंदी होती. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येताच तत्कालीन मंत्री आणि विधीमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी चंद्रपूरची दारूबंदी उठविली होती. मात्र, आता पुन्हा एकदा आमदार मुनगंटीवार यांनी आता जेवढे दारू दुकाने आहेत तेवढी खूप झाली. मात्र, पालिकेत भाजप सत्तेत येताच एकाही नव्या दारू दुकानाला परवानगी दिली जाणार नाही असे सांगितल्याने मद्य विक्रेत्यांचे कान पून्हा टवकारले आहेत.

वारंवार मुनगंटीवार यांच्याकडून दारूविक्रेत्यांना अशा प्रकारे इशारा दिला जात असल्याने दारू विक्रेते वैतागले आहेत. एकीकडे भाजपचे काही खंडणीखोर नेते व पदाधिकारी दारू विक्रेत्यांकडूनच कार्यक्रमांसाठी खंडणी गोळा करतात किंवा खंडणीसाठी वारंवार त्रास देतात, फुकटची दारू ठोसतात आणि आता भाजपचेच मुनगंटीवार जाहीर भाषणात यापुढे नविन दारू दुकानांना परवानगी दिली जाणार नाही असे सांगत आहेत.

# मिशन १०० नगरसेवक ठरणार ऐतिहासिक यश : विकास ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :
नागपूर महानगरपालिका निवडणूक-२०२६ च्या प्रचाराची सांगता होत असताना, शहरभरातून भाजपच्या १९ वर्षांच्या अपयशी, भ्रष्ट आणि जनविरोधी कारभाराविरोधात प्रचंड असंतोषाचा उद्रेक स्पष्टपणे दिसून आला आहे. मतदारांच्या डोळ्यांत आज बदलाची ठाम जाणीव आणि परिवर्तनाची लाट स्पष्टपणे जाणवत असल्याचे प्रतिपादन आमदार विकास ठाकरे यांनी केले.

प्रचाराच्या अखेरच्या दिवशी काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात ठाकरे म्हणाले की, नागपूरकरांनी आता निर्णायक भूमिका घेतली असून, काँग्रेसच्या मिशन १०० नगरसेवकला ऐतिहासिक यश मिळवून देण्याचा ठाम निर्धार जनतेने केला आहे. या निवडणुकीत नागपूरचा कौल स्पष्ट असून, भाजपच्या अपयशाला जनता मतपेटीतून उत्तर देणार आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. ठाकरे पुढे म्हणाले की, भाजपच्या १९ वर्षांच्या अपयशी कारभाराच्या विरोधात काँग्रेसचा २० सूत्री लोकाभिमुख जाहीरनामा हा नागपूरकरांसाठी आशेचा नवा किरण ठरला आहे.

दरमहा ३०,००० लिटर मोफत पिण्याचे पाणी, ५०० चौ.फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ता कर पूर्णतः माफ, महिला व विद्यार्थ्यांसाठी मोफत सिटी बस सेवा, बीपीएल कुटुंबांसाठी खासगी रुग्णालयांत मोफत आरोग्य तपासणी, तरुणांसाठी रोजगारनिर्मितीचे ठोस उपाय यावर नागपुरकरांनी विश्वास व्यक्त केल्याचे ते म्हणाले.

## बुलढाणा नगरपालिकेवर शिंदेसेनेचा कब्जा

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि.१३:
बुलढाणा नगरपालिकेच्या उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्य पदाच्या आज पार पडलेल्या निवडणुकीत शिवसेना शिंदेसेनेने एकतर्फी बाजी मारली. यामुळे आता बुलढाणा पालिकेत बुलढाणा आमदार संजय गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना शिंदे गटाचे एकतर्फी व निर्विवाद वर्चस्व निर्माण झाले.

बुलढाणा पालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेने एकतर्फी विजय मिळवीला होता. पालिका अध्यक्षपदी सेनेच्या पूजा संजय गायकवाड या सहज विजयी झाल्या. तसेच पक्षाने सदस्य पदाच्या एकूण ३० पैकी २२ जागा जिंकून बहुमत मिळविले होते.

## महिलांनी केली चक्क साड्यांची होळी

### साड्या वाटपातून मतदारांना प्रलोभन

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि.१३:
महापालिका निवडणुकीची रणधुमाळी जोमात सुरू असतानाच महिला मतदारांना साड्या वाटप करून प्रलोभन देण्याचा प्रताप एका उमेदवाराने केला. मात्र, त्या साड्यांच्या दर्जावरून महिलांनी संताप व्यक्त करीत साड्यांची चक्क होळी केली. अकोला शहरातील प्रभाग क्रमांक चारमध्ये येणाऱ्या ताथोड नगर परिसरात मंगळवारी हा धक्कादायक प्रकार घडला आहे. साड्या वाटप करणारा नेमका उमेदवार कोण? याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणी अनेकांनी अधिकाऱ्यांकडे तक्रारही केली आहे.

## लोकमानस

# वडाच्या निर्जीव लाकडातून साकारली सजीव कलाकृती

दगडात देवपण साकारणाऱ्या मूर्तिकारांप्रमाणे निर्जीव लाकडात जीव ओतणारे काष्ठ शिल्पकार हे अलौकिक प्रतिभावंत कलेचे भोक्ते असतात. त्यांना सतत असंशोधित क्षेत्र खुणावत राहतात, तसा त्यांचा कलेचा प्रवास पुढे पुढे सरकत राहतो.

यापैकीच एक अशोक जाधव या काष्ठ शिल्पकाराने रस्त्याच्या कडेला मोडून पडलेल्या वडाच्या लाकडात इंगळी (विंचू) बरोबरच कमनीय बांध्याच्या स्त्रीचे हुबेहूब (काष्ठ) शिल्प साकारले आहे. या शिल्पाला त्यांनी 'इश्काची इंगळी' हे नाम विशेष संबोधन दिले आहे.



इश्काची इंगळी साकारणारे कलाकार अशोक जाधव हे मलकापूर (ता. शाहूवाडी) येथील गर्ल्स हायस्कूलमध्ये कला शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. अशोक जाधव (मूळ गाव चिंचोली, ता. शिराळा) हे एके दिवशी कोल्हापूर-रत्नागिरी रस्त्यावरून प्रवास करताना करंजोशी येथे रस्त्याकडेला मोडून पडलेल्या वडाच्या फांदीवर त्यांची नजर स्थिरावली. जवळ जाऊन फांदी न्याहाळताना त्यामध्ये विंचवाचा आकार डोकावला. निसर्गाची ही अद्भुत कलाकृती नजरेआड न करता प्रवासात खंड पाडून आपलीशी केली. यात त्यांना करंजोशी येथील विद्यार्थी शिष्याची मदत मिळाली.

हे काष्ठ (लाकूड) विद्यार्थ्यांच्या घरी ठेवले. यानिमित्ताने कलासक्त जीवनात एखादा प्रसंग, क्षण अविस्मरणीय ठरतो, तसेच काहीसे झाले. विंचवाची प्रतिमा डोक्यात घोळत असल्याने त्यांनी कल्पनाशक्तीतून लाकडाच्या प्राकृतिक रचनेशी हकसंवाद साधला. आणि अप्रतिम दजेदार काष्ठशिल्प आकाराला आले. या निर्मितीला जवळपास दीड वर्ष लागले.

दरम्यान विंचवाचे शिल्प साकारत असताना यामध्ये अजून काही तरी वेगळे करता येईल या ध्यासाने इंगळी आणि इश्काचा डंख यांचा सुंदर मिलाफ साधण्याची कल्पना जाधव यांना सुचली. एक वडाची छोटी फांदी.. त्यात स्त्रीचा कमनीय बांधा आणि दोन्ही बाजूच्या त्या दोन फांद्या या जणू इंगळीच्या बाकदार, टोकदार नांग्याच. त्याच फांद्या या वर हात केलेल्या स्त्रीचे घायाळ करणारे रूप भासवतात.

या प्रतिकृतीत वक्षस्थळ, ओटीपोट आणि कंबरड्‌ आणि त्या खाली एक पाय जणू प्रेम लाथाडत असल्याचे हे आभासी काष्ठशिल्प म्हणजे निसर्गाच्या कुशीतून जन्मलेला अद्भुत चमत्कारच म्हणावा लागेल.थोडक्यात या निसर्गदत्त अनमोल कलाकृतीमध्ये एका बाजूला इंगळी (विंचू)चा नांगा तर दुसऱ्या बाजूला स्त्रीचा हात तयार केला आहे. त्या खालील लाकडाच्या जाडीत कमनीय सुडौल स्त्रीचा एकीकडे पाय, तर दुसऱ्या बाजूला इंगळीची शेपटी नांगा जो डंक मारण्यासाठी पुढे केलेला दिसतो. एकंदरीत स्त्रीच्या सुंदर सुडौल बांध्याची मोहकता, तिची चंचलता, दगाबाजी आणि इंगळीचा चपळपणा या शिल्पातून साकारण्याची किमया साधली गेली आहे.

अशा या कल्पनेच्या भावभावनांचे दर्शन घडविणारे हे शिल्प नग्न दिसत असले तरी त्यात अश्लीलता नाही. सत्याशी जखडलेली ही नग्नता आणि शोधकता हा या कलेचा हेतू दर्शवितो. हे जग मनानं, सौंदर्यानं अधिक नटावं, त्या ईश्वराच्या देण्याचा साक्षात्कार सामान्य माणसांना घडावा, त्यातून त्यांचं जीवन उन्नत व्हावं, हाच शुद्ध हेतू कलावंत म्हणून जवळ बाळगावाच लागतो, असे 'इश्काची इंगळी' काष्ठशिल्पकार अशोक जाधव हे आपल्या कलेबद्दल प्रांजळपणे सांगतात.

■ ■ ■



## मुंबई मॅरेथॉन मध्ये १३५ धावपटू धावत-धावत साजरा करणार वाढदिवस

रविवार, १८ जानेवारी रोजी होणाऱ्या टाटा मुंबई मॅरेथॉन २०२६ मध्ये ६९,००० हून अधिक धावपटू सहभागी होणार आहेत. यापैकी १३५ धावपटू याच दिवशी आपला वाढदिवस धावत साजरा करणार आहेत.या वाढदिवस साजरा करणाऱ्या धावपटूंमध्ये ९३ पुरुष आणि ४२ महिला आहेत. केक कापण्याऐवजी त्यांनी फिटनेस आणि आरोग्याचा संदेश देत धावण्याचा निर्णय घेतला आहे.यंदाच्या मॅरेथॉनसाठी आतापर्यंत ६९,१०० जणांनी नोंदणी केली आहे. या १३५ धावपटूंच्या कहाण्या मॅरेथॉनमधील अनेक वैयक्तिक अनुभवांपैकी काही खास क्षण दाखवतात.

१५ वर्षांपेक्षा जास्त काळ मॅरेथॉन धावणारे २२ धावपटू टाटा मुंबई मॅरेथॉन २०२६ मध्ये काही धावपटू गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने सहभागी होत आहेत. २२ धावपटू असे आहेत, जे १५ वर्षांहून अधिक काळ फुल मॅरेथॉन धावत आहेत.६ धावपटू १५ वर्षे,१० धावपटू १६ वर्षे,२ धावपटू १७ वर्षे, तर ४ धावपटू १९ वर्षे माराथोन मध्ये धावत आहेत.ही मॅरेथॉन केवळ धावण्याची स्पर्धा नाही, तर सामाजिक कामांसाठीचे मोठे व्यासपीठही आहे. यंदा २,२०१ सामाजिक संस्था विविध शर्यतींमध्ये सहभागी होणार आहेत.

■ ■ ■

## असा लागला शोध पाणी गरम करणारे गिझर

गिझरचा शोध बेंजामिन वाडी मॉघन यांनी १८६८ मध्ये लावला, ज्याने पहिला 'गॅस गिझर' (तात्काळ पाणी गरम करणारे उपकरण) तयार केले; मात्र, त्यात सुरक्षेची काळजी नव्हती, म्हणून नंतर एडविन रुड या नॉर्वेजियन इंजिनिअरने १८८९ मध्ये सुरक्षित स्वयंचलित वॉटर हीटर तयार केले, ज्यामुळे गिझर घराघरात लोकप्रिय झाले.




बेंजामिन मॉघन यांनी १८६८ मध्ये एक उपकरण बनवले, जे थंड पाण्याला एका कॉपर बॉयलरमधून गरम करत असे आणि थेट नळातून गरम पाणी बाहेर काढत असे. त्यांनी याला 'गिझर' असे नाव दिले, जे आइसलँडमधील नैसर्गिक गरम पाण्याच्या झऱ्यावरून प्रेरित होते. मॉघन यांच्या डिझाइनमध्ये गॅस बाहेर काढण्यासाठी व्हेंट नव्हता, ज्यामुळे ते धोकादायक होते आणि त्यात स्फोट होण्याचा धोका होता.या समस्येवर उपाय म्हणून, एडविन रुड यांनी १८८९ मध्ये फिलाडेल्फियामध्ये पहिला स्वयंचलित वॉटर हीटर तयार केला. त्यांनी मॉघन यांच्या डिझाइनमध्ये आवश्यक सुरक्षा वैशिष्ट्ये जोडली.रुड यांनी तयार केलेले हे वॉटर हीटर आजच्या आधुनिक वॉटर हीटरच्या टाकीसारखे होते आणि त्यामुळेच ते लोकप्रिय झाले. बेंजामिन वाडी मॉघन (पहिली आवृत्ती, १८६४) आणि एडविन रुड (स्वयंचलित, सुरक्षित आवृत्ती, १८८९).थंड पाणी एका हीटरमधून (सुरुवातीला गॅस, नंतर वीज) पाठवून ते गरम करणे आणि थेट वापरण्यासाठी उपलब्ध करणे या शोधांमुळे गरम पाणी मिळवणे सोपे झाले आणि ते आवश्यक ठरले.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## बनावट शिक्के मारून 'बोगस पट्टे' वाटप

# कसनगोट्टूवार यांना अटक करा

### खा. प्रतिभा धानोरकर यांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. १३:
निवडणुकीच्या तोंडावर सरकारी यंत्रणेचे बनावट शिक्के वापरून गरिबांची फसवणूक करणाऱ्या प्रवृत्तींना जेलमध्ये पाठवा, अशी आक्रमक भूमिका खासदार प्रतिभा धानोरकर यांनी घेतली आहे.

चंद्रपूरच्या राजू नगर परिसरात भाजप उमेदवार सुभाष कासनगोटूवार यांनी बनावट शिक्के असलेले 'बोगस पट्टे' वाटल्याचे महानगरपालिकेच्या चौकशीत स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी कासनगोटूवार यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

या प्रकरणात खासदार प्रतिभा धानोरकर यांनी स्वतः जिल्हा पोलीस अधीक्षक व चंद्रपूर शहर महानगर पालिका आयुक्त यांची भेट घेऊन भाजपचे अधिकृत उमेदवार सुभाष कसनगोट्टूवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावेळी माजी शिक्षणमंत्री वसंत पुरके, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे, काँग्रेस नेते विनोद दत्तात्रय, सुभाष गौर, प्रशांत भारती यांची उपस्थिती होती.

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन चंद्रपूर शहर महानगरपालिकेने स्वतः पुढाकार घेऊन तपासणी केली असता, संबंधित सर्व शिक्के आणि कागदपत्रे प्रशासकीय स्तरावर अधिकृत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. महानगरपालिकेच्या उपायुक्तांनी रामनगर पोलीस स्टेशनला दिलेल्या पत्रात हे शिक्के बनावट असल्याचे मान्य केले असून, हा प्रकार शासकीय कामकाजाच्या विश्वासार्हतेला बाधा पोहचवणारा असल्याचे म्हटले आहे.

पालिकेच्या नगर रचना विभागामार्फत असे कोणतेही शिक्के तयार करण्यात आले नसल्याचे तपासात निष्पन्न झाले असून प्रशासनाने देखील दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

सध्या शहरात आदर्श निवडणूक आचारसंहिता लागू असताना, मतदारांना प्रलोभन देण्यासाठी सरकारी मोहोर आणि पदाचा गैरवापर करून बोगस पट्टे वाटणे हे आचारसंहितेचे थेट उल्लंघन आहे. हा प्रकार भारतीय न्याय संहितेअंतर्गत फौजदारी स्वरूपाचा गुन्हा असून, यामध्ये फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे आणि शासकीय यंत्रणेची बदनामी करणे असे गंभीर गुन्हे घडलेले आहेत.

व्हॉट्सॲप ग्रुप्सवर प्रसारित झालेले फोटो आणि व्हिडिओ हे या गुन्ह्याचे सबळ पुरावे असून, राजकीय फायद्यासाठी जनतेची फसवणूक करणाऱ्या या प्रवृत्तींना आळा घालणे आवश्यक असल्याचे खासदार प्रतिभा धानोरकर यांनी नमूद केले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून सुभाष कासनगोटूवार आणि त्यांना मदत करणाऱ्या सर्व आरोपींविरुद्ध निवडणूक आचारसंहिता भंग आणि फसवणुकीचा त्वरित गुन्हा दाखल करावा, अशी विनंती खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केली आहे.

सामान्य जनतेची फसवणूक थांबवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे. या प्रकरणी महानगरपालिकेने पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी सहायक नगर रचनाकार प्रतिक देवतळे यांची नियुक्ती केली असून, पोलीस प्रशासनाकडे तक्रार देखील वर्ग करण्यात आली आहे.

## बावनकुळेंच्या किती खाणी?

### १६ नंतर खुलासे करणार : बच्चू कडू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३:



प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर अतिशय गंभीर आरोप करत राजकीय वातावरण तापवले आहे.

बावनकुळे यांच्या नावावर अनेक खाणी असून त्या खाणींवरून जगदंबा ट्रॅव्हल्सचे किती ट्रक चालतात, याची चौकशी करण्याचे थेट आव्हान बच्चू कडूंनी दिले आहे. ही केवळ आरोपांची सुरुवात असून, येत्या १६ तारखेच्या मतमोजणीनंतर बावनकुळे यांच्याशी संबंधित सर्व पुरावे सार्वजनिक करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या आरोपांमुळे मोठी खळबळ उडाली असून, भाजपची कोंडी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

माध्यमांशी संवाद साधताना बच्चू कडूंनी भाजपवर जोरदार टीकास्त्र सोडले. भाजप मोठ्या प्रमाणात पैसा वापरत असल्याचा आणि तो खुलेआम वाटत असल्याचा आरोप त्यांनी केला. भाजपकडे एवढा पैसा कुठून आला, हा खरा प्रश्न आहे.

नोटाबंदीमध्ये भाजपने लूट केलीच आहे. त्यांनी कशात लूट केली नाही ते तरी सांगा, असा थेट सवाल कडूंनी उपस्थित केला. भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप करताना त्यांनी एकही क्षेत्र असे नाही जिथे भाजप पैसे खात नाही, असा घणाघाती दावा केला. या वक्तव्यामुळे भाजपविरोधी राजकीय वातावरण अधिकच आक्रमक होताना दिसत आहे.

बावनकुळे यांच्या किती खाणी आहेत आणि त्या खाणींवरून किती ट्रक चालतात, याची माहिती बाहेर यायला हवी, असे सांगत त्यांनी जगदंबा ट्रॅव्हल्स कंपनीचा उल्लेख केला. या कंपनीचे ट्रक नेमके किती आहेत आणि ते कुठे-कुठे काम करतात, याची चौकशी करण्याचे आव्हान त्यांनी माध्यमांमार्फत दिले. याचे पुरावे असल्याचेही कडू म्हणाले.

# उपराजधानीत बनावट मद्याचे कारखाने उघड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३:
शहरात सध्या महापालिकेच्या निवडणूकीची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे मतदार आणि कार्यकर्त्यांना खुष करण्यासाठी मद्याची विक्री जोमात आलेली असतानाच उत्पादन शुल्क विभागाने शनिवारी मध्यरात्रीपासून मोठे छापासत्र राबवत देशी- विदेशी बनावट मद्यचा कारखाना उधळून लावला.

एका पाठोपाठ चार ठिकाणी केलेल्या या छापासत्रात उत्पादन शुल्क विभागाने बनावट देशी मद्याच्या १००० बाटल्या आणि बनावट विदेशी मद्याच्या ५२८ बाटल्या जप्त केल्या. या मद्याचे बाजारमुल्य जवळजवळ ११ लाख असल्याचे सांगितले जात आहे. हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

उत्पादन शुल्क विभागाने टाकळघाट परिसरातील गोंडपिंपरी, कान्होलीबारा, कपीलनगर आणि कामठी खैरीतील साठवणूक केंद्रावर हे छापे टाकले. यापैकी टाकळघाटच्या गोंडपिंपरीत निर्जन स्थळी बनावट देशी मद्य बनवले जात होते.

हिंगणा तालुक्यातील कान्होली बारातल्या देवळी पेंढरी रस्त्यावर निर्जन स्थळी बनावट विदेशी मद्य तयार केले जात होते. उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी हे बनावट मद्य तयार करण्यासाठी डिस्टिल वॉटर आणि स्पिरीट पुरवणाऱ्या कपीलनगरातील पुरवठा दारावरही छापा टाकला.

शुभम तिवारी हा या बनावट मद्य पुरवठा साखळीतला मुख्यसुत्रधार असून पथकाने त्याच्यासह प्रत्यक्ष बनावट कारखान्यावर उपस्थित ९ जणांना अटक केल्याची माहिती मिळत आहे.

